म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
क्र. ९९८२



REFBK-0018594
REFBK-0018594

कवि — द.ग.जयवं

# जयवन्ती

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक
अनुक्रम ७९५९३ वि: काव्य
क्रमांक 2992 नोंद दि: 2.2.93

संग्रह शाखा
दा. क्र.

REFBK-0018594
REFBK-0018594

कवि, द. ग. जयवंत
दादर

प्रमुख वितरक :—
बॉम्बे बुक डेपो
गिरगांव, मुंबई–४.

प्रकाशक
द. ग. जयवंत
खांडके बिल्डींग २/१७,
न. चिं. केळकर रोड,
दादर–मुंबई २८.

□

सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन

□

मुखपृष्ठ
चित्रकार, गांगल

□

प्रथमावृत्ति
१९७२

□

मुद्रक
एलोरा प्रिंटर्स
काकड इंडस्ट्रीयल एस्टेट माहीम.

□

किंमत ५ रुपये

# अनुक्रमणिका


| नं. | कविता | पृष्ठ |
|---|---|---|
| | प्रस्तावना | १ |
| १ | खेडेगांवांतील सकाळ | ९ |
| २ | अभागी फुलें | १२ |
| ३ | कवीचा आनंद | १४ |
| ४ | कवि आणि कांता | १५ |
| ५ | देणगी | १८ |
| ६ | ऐक्याचा अभाव | १९ |
| ७ | पारखी हिंदभूमि जाहली | २० |
| ८ | कळीं आणि कवि | २२ |
| ९ | कवीची दौलत | २२ |
| १० | हृदयाची चोरी | २३ |
| ११ | स्फूर्ति आणि काव्य | २४ |
| १२ | प्रतिकार | २५ |
| १३ | समाजकंटकास | २७ |
| १४ | हृदयवल्लभे | २९ |
| १५ | चुंबनाचे ऋण | ३० |
| १६ | जय जवान जय किसान | ३१ |
| १७ | तूं आणि मी | ३३ |
| १८ | सौ. निर्मलेस पत्र | ३४ |
| १९ | पौर्णिमेच्या चंद्रास | ३७ |
| २० | सूर्यास्तानंतर | ३९ |
| २१ | नाजुक चिंता | ४१ |
| २२ | निर्माल्य झालीं फुलें | ४२ |
| २३ | स्फूर्ति आणि निसर्ग | ४३ |
| २४ | लो. बाळ गंगाधर टिळक यांचें पुण्यस्मरण | ४५ |
| २५ | पश्चात्ताप | ४७ |
| २६ | अमावास्या | ४८ |
| २७ | मराठी मना ! | ४९ |
| २८ | धुकें | ५१ |
| २९ | अनभिज्ञ | ५२ |
| ३० | भाऊबीज | ५३ |
| ३१ | धिक् धिक् तयाचे जिणे | ५४ |
| ३२ | शतायुषि करी माझ्या या पाडसा | ५५ |
| ३३ | प्रणय-दीप | ५६ |
| ३४ | पौर्णिमा कीं अमावास्या ? | ५७ |
| ३५ | तारापतन | ५९ |
| ३६ | तुझी फुलें | ६१ |
| ३७ | गतभर्तृकेचे करुणोद्गार | ६३ |
| ३८ | पौर्णिमा | ६५ |
| ३९ | नावबाण | ६७ |
| ४० | अरसिकाचा अभिप्राय | ६८ |
| ४१ | क्षणभरी रहा तूं उभी अशी | ६९ |
| ४२ | हुरहूर | ७० |
| ४३ | कवि आणि कैवर्तक | ७१ |

| नं. | कविता | पृष्ठ |
|---|---|---|
| ४४ | दंवबिंदु | ७२ |
| ४५ | वृक्ष आणि लता | ७३ |
| ४६ | देवी श्री अहिल्याबाई | ७५ |
| ४७ | बा परमेश्वरा ! | ७६ |
| ४८ | विप्र आणि अस्पृश्यकन्या | ७९ |
| ४९ | हाय ! हाय ! आई गेली | ८१ |
| ५० | निद्रिस्त कवीस | ८२ |
| ५१ | तिमिरांत खरा | |
| | यश–मार्ग असे | ८४ |
| ५२ | सौख्यमग्न फूल | ८५ |
| ५३ | रविवारीं भोजनोत्तर | ८७ |
| ५४ | विरहिणी | ८९ |
| ५५ | तेव्हां आणि आतां | ९१ |
| ५६ | 'होय' म्हणतांना | ९३ |
| ५७ | आराम हराम है | ९४ |
| ५८ | मीलन | ९६ |
| ५९ | मार्गप्रतिक्षा | ९७ |
| ६० | चल चढावया | |
| | संसार–गिरी | ९९ |
| ६१ | अबोला | १०० |
| ६२ | विमानास | १०१ |
| ६३ | कवि | १०३ |
| ६४ | वेणुनाद | १०५ |
| ६५ | आगगाडीत | १०७ |
| ६६ | लेखणी आणि तागडी | १०९ |
| ६७ | जल–तरंग | १११ |
| ६८ | मी जाणित नाहीं तुला | ११२ |
| ६९ | भाग्यवान कोण | ११४ |
| ७० | मद्याधीन कविमित्रास | ११५ |
| ७१ | गोड बंदिवास | ११६ |
| ७२ | जादुवाला | ११८ |
| ७३ | कल्याणचा | |
| | श्री राममारुती तिथ्युत्सव | ११९ |
| ७४ | निसर्गाचें संगीत | १२१ |
| ७५ | धिक् मानवी जीवित | १२२ |
| ७६ | केवळ तुझ्यासाठी | १२३ |
| ७७ | शोभा गृहाची | |
| | गृहिणी सुशील | १२४ |
| ७८ | निसर्गाचा न्याय | १२५ |
| ७९ | झुरतेस अशी कां | |
| | सांग मनीं ? | १२६ |
| ८० | ध्येय–मार्गावर | १२७ |



कवि, द. ग. जयवन्त

## प्रास्ताविक :

आजचे नवकवी छातीठोकपणें म्हणतात, कीं खरे काव्य अर्थापलीकडे असते ना ! तर मग आमच्या काव्यांत कमीत कमी अर्थ आणि अधिकात अधीक काव्य पहा,—या कवितेचा अर्थ काय म्हणून विचारू नका ! 'जयवन्ती' संग्रहाचे कर्ते कवि जयवंत या टोकाच्या अगदी उलट्या टोकाचे आहेत असे हा संग्रह वाचणाराला वाटेल. १९३० ते आजतागायत त्यांच्या कविता **'विविधज्ञानविस्तार' 'विविधवृत्त' 'वऱ्हाडशाळापत्रक' 'स्त्री' 'मनोरंजन' 'यशवंत' 'चित्रमय जगत'** इत्यादि नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत, आणि आजच्या कवींच्या आधीच्या पिढीतले ते आहेत, ही गोष्ट या कविता वरवर पहाणाराच्याही ध्यानांत येईल. त्या पिढीतल्याही 'काव्यरत्नावली' कारांच्या—

**तीं तीं पदें नित्य फिरून येती**
**त्या त्याच अर्थाप्रति दाविताती**
**कौशल्य मोठें रचनेंत आहे**
**सत्काव्य तेणें नव वाटताहे**

या सात्त्विक, सोज्वळ सत्काव्य परंपरेचे ते आहेत अर्थ आणि रचना या दोहोंना त्यांच्या काव्यांत अधिकात अधिक मान आहे.

**आर्या, साकी, दिंडी, अभंग, प्रणयप्रभा, भूपती खरे ते 'शार्दूल विक्रीडित'** इत्यादि अनेक जुनी वृत्तें आणि चाली त्यानीं सफाईदारपणे वापरल्या आहेत. भाषेवरही त्यांचे चांगले प्रभुत्व आहे. काव्य आणि लेखन यांच्या जीवनातल्या श्रेष्ठ स्थानाबद्दल त्यांची पुरेपूर खात्री आहे. ते म्हणतात,

**भावपूर्ण गोड काव्य लिहायाचे**
**येरा-गबाळाचे काम नोहे**

असावें लागतें ज्ञान तयासाठीं
कीर्ति न ये पाठी आपोआप
तपश्चर्या हवी काव्य-लेखनास
काय निर्बुद्धास कथावें मी?

शाहिराची थाप डफावरी पडे
क्रांतीचे चौघडे वाजतात

'कवीचा आनंद' वर्णितांना ते स्वच्छ सांगतात कीं

हर्ष कविला रतिमीलनात नाहीं
सृष्टिशोभा अवलोकनात नाहीं
मोद नाहीं स्मित शिशूचे पहातां
काव्य प्रसुतीचा हर्ष कविस मोठा

भर्जरीचे नव शालु पांघरून
अलंकारांनी देह भूषवून
थवे होते पथिं जात सुंदरींचे

ते पाहून गृहिणी दीर्घसा उसासा सोडते, तेव्हां कवि म्हणतात,

'काव्य संपत्ती विपुल ही मदीय
अधिक अपणाला हवें सांग काय?
काव्यमय हा संसार रुचिर माझा
त्यांत राणी तूं, मीहि तुझा राजा'

स्त्री–पुरुष संबंधा संबंधीही कवींची पराकोटीची सात्विक मतें आहेत्त. 'देणगी' कवितेंत गृहिणी म्हणते,

देवरायें दिला मला अलंकार
विश्वाहुनी थोर मोल ज्याचें

चिंतनांत ज्यांच्या मला स्वर्ग सात
असे प्राणनाथ देव माझे
गरिबीचा जरी माझा हा संसार
सुख अनिवार यांत मला
अपेक्षा न मला हिऱ्या-माणकांची
वृथा आस त्यांची धरू का मी
नका मला देऊ पैठणी भर्जरी
लोभ कां अंतरीं धरू तिचा ?
'देणगी' तुम्हाला जर द्यावयाची
पुडी कुंकवाची द्यावी एक

त्या काळातल्या बऱ्याचशा कवींप्रमाणें या कवीनींही स्वदेश आणि स्वातंत्र्य यांच्याबद्दलचे उत्कट प्रेम व्यक्त केले आहे, कवी सिलोनमध्यें असतांना म्हणतात,

'क्षिति नयनमनोहर निसर्ग शोभा इथे
वाटते रहावे अवलोकित कौतुके
हें नंदनवन परि मजला वाटे फिके
जोंवरि माझ्या हिंदभूवरी पाय न मी टेकला
नसे स्वारस्य कशांतहि मला

'प्रतिकार' कवितेची नायिका स्वातंत्र्ययुद्धात उडी टाकावयाला सज्ज झालेल्या नायकाला प्रतिकार करूं पहाते तेव्हां तो तिला म्हणतो,

दुर्दैन्य मायभूमीचे-पाहुनी हृदय हें माझें-फाटते
शृंखला पारतंत्र्याची-तटतटा त्वरें तोडावी-वाटते
हा काल-कीर्ति तेजाळ-आण झणि ढाल
आणि तलवार-मज करूं नको प्रतिकार-लाडके

ढाल-तलवारीने मिळवावयाचे हे स्वातंत्र्य मराठ्यांच्या इतिहासातले आहे— अलिकडल्या सत्याग्रह कालातले नाही, हें उघड आहे.

लोकमान्य टिळकांवरील कवितेंत आधुनिक स्वातंत्र्यवीराबद्दलचा अत्यादरही कवीने तितक्याच आपुलकीने व्यक्त केला आहे.

निसर्गातली किंवा जीवनातली दृष्यें चितारतांना कविमनाचा हळवेपणा जागोजाग दिसून येतो.

'कवि आणि कैवर्तक' या कवितेंत समुद्रातले मासे पकडण्याकरिता गळ टाकून बसलेला एक कोळी कवीला दिसतो. तेव्हां कवी त्या धीवराला म्हणतो,

**'त्वत्कंठीं यमही असाच अपुला घालील रे वागुरा**
**याचा काय विवेक नाहिं अपुल्या केलास तूं मानसीं ?**
**तत्त्वज्ञान मदीय हे उमगले त्या सुज्ञ कैवर्तका**
**बोले सद्गत होत, 'जीव जगती सर्वांप्रती सारखा'**

या ओळींतल्या 'सद्गत' शब्दाप्रमाणें इतर एक दोन कवितांत 'निसर्गता' 'मांगल्यता' 'कंटकता' असे कांहीं शब्ददोष आणि कांहीं मात्रादोषही राहून गेले आहेत.

अलिकडे खेडीं ओस पाडून शहरांकडे धांवणाऱ्या लोकांच्या झुंडी दिसतात; पण कवि मात्र 'खेडेगावांतील सकाळ' या कवितेंत म्हणतात,

**खेड्यांतिल हे वैभव पाहुनि विचार येतो मनीं**
**नको ती शहरातिल राहणी**

समाजसुधारणेबाबतही त्यांचा दृष्टिकोण 'संतप्त' नसून हळवाच आहे.

तरुणपणीच वैधव्य कपाळी आलेल्या स्त्रियांवर लिहिलेल्या एक दोन कवितांत तो चांगला व्यक्त होतो. 'गतभर्तृकेचे करुणोद्गार'मध्यें विधवा म्हणते

'वैधव्यान्धःकारीं धडपडतो आम्हि दीनशा गाई
द्रव न समाजास फुटे, किति हा पाषाणहृदयि तरि बाई
कुंकुमतिलकाविण या भालप्रदेशास पाहुनी धवल
करुणा न ये समाजा कैशी? याचेच वाटते नवल'

'विप्र आणि अस्पृश्यकन्या' या कवितेंत एक अस्पृश्य समाजातली तहानेने व्याकूळ झालेली मुलगी ब्राम्हणाच्या वाड्यासमोर जाऊन पाणी मागते. तेव्हां

विप्र बोले गृहगवाक्षामधून
त्वरित होई तूं चालती इथून
महारांना पाजावयास पाणी
काय नोकर ठेविले इथे कोणी?

हे ऐकून

बालिका ती लावून हात भाळा
म्हणे, देवा! हा न्याय काय झाला?
अंध अमुचा हा सर्वदा समाज
कोण अमुची राखील प्रभो! लाज?

अशा प्रकारच्या सरळ, अकृत्रिम कविता पुष्कळांना आवडतील याबद्दल माझी खात्री आहे.

अनंत काणेकर
९ नोव्हेंबर ७२

# हृद्गत

**वास्तविक** माझा हा काव्य-संग्रह चाळीस वर्षापूर्वीच निघावयास हवा होता, कारण १९२८ ते ३५ चे दरम्यान माझ्या कविता महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व प्रमुख मासिकात सतत प्रकाशित होत राहिल्याने मी काव्यप्रेमी जनतेस चांगलाच परिचित होतो. कांहीं कौटुंबिक अडचणीमुळे, आणि नोकरी व्यवसायांत असतांना ८ ते १० वर्षे सिलोनला माझे वास्तव्य होत राहिल्यानें मला माझ्या कवितेकडे लक्ष द्यावयासही वेळ मिळाला नाहीं. एवढ्या दीर्घ कालावधीनंतर का होईना माझा काव्यसंग्रह आज प्रकाशित होत आहे याबद्दल मला आनंद वाटत आहे. विद्यार्थीदशेतच मला काव्याची आवड निर्माण झाली. वयाच्या एकविसाव्या वर्षापासून माझी कविता मासिकातून प्रसिद्ध होऊ लागली. आणि कांही कविश्रेष्ठांच्या प्रोत्साहनाने मी उत्तेजीत झालो.

एक गोष्ट मात्र रसिकवर्गाने लक्षांत ठेवावयास हवी, ती म्हणजे माझ्या बहुतेक कविता स्वातंत्र्यपूर्व कालांतील आहेत. त्यामुळे साहजिकच स्वातंत्र्या-बद्दल प्रेम व पारतंत्र्याबद्दलचा तिरस्कार कांहीं कवितांतून प्रतिबिंबीत झाला आहे. कांहीं सामाजिक विषयांवरील कविता विशिष्ट घटना माझ्या डोळ्यांपुढे आल्याने निर्माण झाल्या आहेत. सांप्रत नवकाव्याचा जमाना आहे. काल-प्रवाहाबरोबर सांप्रतचे नवकाव्य वहात आहे. आणि अशा परिस्थितीत माझ्या जुन्या घाटणीच्या कविता मी रसिकांपुढे ठेवीत आहे, हें माझे आजचे धाडसच आहे. माझ्या कवितांचे मूल्यमापन आणि स्वागत रसिकवर्गाकडून होईल अशी मी अपेक्षा करितो. लहान मुलांसाठी मी अनेक कविता लिहिल्या आहेत, व त्या सर्व प्रसिद्धही झाल्या आहेत. यानंतरचा काव्यसंग्रह केवळ मुलांसाठी काढावयाचा विचार आहे. माझ्या या 'जयवन्ती' संग्रहाचे योग्य स्वागत काव्यप्रेमी जनतेकडून झाल्यास मला ते शक्य होईल.

माझा 'जयवन्ती' हा काव्यसंग्रह मुद्रण स्वरूपांत आणण्याचे महत्कार्य एलोरा प्रिंटर्स, माहिम या छापखान्याचे मालक श्री. शेट्ये यांनी व त्यांच्या

प्रेसमधील कर्मचारी बंधूंनी आस्थेवाईकपणाने पार पाडले याबद्दल मी त्या सर्वांचा आभारी आहे. 'जयवन्ती' या पुस्तकाच्या मुखपृष्ठाची सजावट प्रसिद्ध चित्रकार श्री. गांगल यांनी कुशलतेने त्वरित करून दिली. पुस्तकाचे आंतील माझे छायाचित्र निकेता फोटो स्टुडिओचे मालक श्री. देवेंद्र वैद्य यांनी काढले आहे. पुस्तकावरील मुखपृष्ठचित्र व माझे आंतील छायाचित्र यांचे ब्लॉक्स बॉम्बे प्रोसेस स्टुडिओचे मालक श्री. कामत यांनी अल्पावधीत करून दिले. या सर्व कलावंतांचा मी आभारी आहे.

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. अनंत काणेकर यांनी वेळांतवेळ काढून माझ्या कविता वाचल्या व विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना माझ्या पुस्तकास लिहून दिली याबद्दल मी कोणत्या शब्दांत त्यांचे आभार मानावेत ?

माझे कविमित्र श्री. श्रीकृष्ण पोवळे ( संपादक 'अलका' ) यांचे मला बहुमोल सहाय्य झाले. मित्रप्रेमाने प्रेरीत होऊन माझ्या पुस्तक प्रकाशनाचे कार्य त्यांनी हाती घेतले व ते त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. त्यांनी दाखविलेल्या आपुलकीबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

त्याचप्रमाणे माझे कविमित्र दत्तप्रसन्न कारखानीस, कवि प्रफुल्लदत्त, कवि राजाबढे, नागपूरचे कवि भ. श्री. पंडित, पुण्याचे ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील इत्यादि कविमित्रांचा, व मुंबईचे साहित्यिक वा. रा. ढवळे यांनी माझे पुस्तकाचे बाबतींत जो जिव्हाळा दर्शविला व उपयुक्त सूचना केल्या याबद्दल मी त्यांचाही आभारी आहे.

दादरच्या 'सुयश' साप्ताहिकाचे संपादक श्री. त्रि. बा. परळकर यांनी माझ्या निवडक कवितांचा संग्रह पुस्तकरूपानें निघावा अशी इच्छा प्रदर्शीत केली, व त्या दिशेनें चालनाही दिली. त्यांनी दाखविलेल्या आपुलकीबद्दल मी फार आभारी आहे.

शेवटी रसिकजनांस हेंच सांगावयाचे कीं,

**भावफुलें हीं गुंफुनि रसिकांच्या आज देतसे हातीं**
**प्रेमळ स्वागत होतां, माझी होईल धन्य 'जयवन्ती'**

*द. ग. जयवन्त*

# पितृचरणीं

काव्याचे नित मार्गदर्शन जयें केलें मला जीवनीं
ज्यांनी देउनि प्रेरणा निशिदिनी सत्काव्य आलेखनी
त्या माझ्या वडिलांस, काव्य-कुसुमें हीं आज मी गुंफुन
श्रद्धेने 'जयवन्ति' पितृचरणी प्रेमें करी अर्पण

# खेडेगांवांतील सकाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. २८७०४
(स्थळ प्र

पहाट झाली, मंद समीरण गीत गाउं लागला
विहंगम साथ करिति त्याजला
प्रशांत समयीं अशा चिमुकल्या जीर्ण झोपडींतुनी
श्रवणि ये मंजुल गीत-ध्वनी
कृषिवल-युवती कुणी दळाया बसली जात्यावर
मुखानें गीत गात सुस्वर
आम्रतरूवरि करूं लागली साथ तिला कोकिळा
आपुला गळा करुनि मोकळा
लागली हंसाया तोंच उषासुंदरी
सुप्रसन्न दिसतो निसर्ग गिरिकंदरी
प्रमुदीत जाहले शेतकरी अंतरीं
स्नानादिक प्रातर्विधि करुनी, नांगर धरण्या करीं
निघाले अपुल्या शेतावरी ॥१॥

गुरें घेउनी वनीं चालली शेतकऱ्यांचीं मुलें
ठेवुनी खांद्यावरि कांबळें
द्वड मुलें हीं काळिसावळीं, आणि बावळीं जरी

शरीरीं कंटकता बहुपरी
गोफण फेंकुनि वृक्षावरलीं उडवीती पांखरें
चरवितां गाई अन् वांसरें
सदैव फिरती रानोरानीं, भीति न लव मानसा
खेळती खेळ वनीं स्वैरसा
ही शेतकऱ्यांचीं मुलें वानरापरी
ओंलांडुनि जाती क्षणांत डोंगर दरी
कधिं स्वैर भटकती डोंगर माथ्यावरी
भूक लागतां भाकर खाती बसूनियां तरुतळीं
न त्यांना बंधन अगदीं मुळीं ॥२॥

कृषिक-योषिता कुणी निघाल्या हळूहळू नदिकडे
घेउनी मृत्तीकेचे घडे
कुणी गोवऱ्या थापुं लागल्या चिमुकल्याच अंगणीं
झाडिती अंगण अपुलें कुणी
घेउन हातीं विळे, चालल्या शेतावरती कुणी
कराया भाताची कापणी
उत्साहानें उठुनि पहाटे, कुणी धन्यासंगती–
आपुल्या मळ्यामधें राबती

डुलवितो समीरण मंद मंद हा मळा
पिकलेला दिसतो यांत गहूं, जोंधळा
धनि करिल कापणी घेउन हातीं विळा
खेड्यांतिल हें दृश्य पाहुनी प्रसन्न होते मन
नको तें शहरांतिल जीवन ॥३॥

निळसर, गहिरे, सभोंवताली उंच उंच डोंगर
त्यांमधें हें खेडें सुंदर
निवडुंगाचे या खेड्याला कांटेरी कुंपण
बांधिलें व्हाया संरक्षण
शेतांमधली अरुंदशी ही पायवाट पाहुन
गमे, पहुडली कुणी नागिण
झुळझुळ वाहे पलीकडे ती प्रशांत जलवाहिनी
रिझविते जणूं गान गाउनी
हे बजरंगाचे देवालय चिमुकले
पावित्र्य जगाला दर्शविते येथले
वनदेवताहि दावितें विभव आपुलें
खेड्यांतिल हें वैभव पाहुनि विचार येतो मनीं
नको ती शहरांतिल राहणी ॥४॥

'सुगी'

# "अभागी फुलें" (अभंग)

उन्हाळ्याचे दिन, बाराचा सुमार – अंगाची हो फार लाहीलाही
शीर्षावरी सोडी रवि हा निखारे – जणूं विश्व सारे जाळणार
जलावीण सर्व शुष्क नद्या, नाले – तरू दुःखी झाले पर्णावीण
गुरें ढोरें सारीं व्याकूळ तान्हेनें – देव एक जाणे हाल त्यांचे १

जनां तोष द्याया जरी वायू आला – अग्निचीच ज्वाला वाटतसे
चालतांना पथीं तापलेली धूळ – ठेवितां पाऊल होरपळे
अशा या स्थितींत कुणी एक बाला – विभुदर्शनाला जात होती
आजच नव्हे, ती जात आहे नित्य – पूजेचें साहित्य घेऊनीयां २

परी आज होती शुभ्र वस्त्रांकित – जणूं चमकत चांदणीच
वेणीवर होता खोवीला गुलाब – गालाचे गुलाब फुललेले
पारिजातकाच्या फुलांचेच देठ – तिचे दोन ओठ वाटतात
नेत्रव्दय तीचे, जणूं दोन भृंग – मती होते गुंग पाहुनीयां ३

तिच्या हृदयाच्या राजवाड्यावर – दोन भालदार सदा उभे
शरीरानें जणूं मृदुल वल्लरी – कांती होती परी गौर तिची
पारिजातकाची फुलें परडींत – घेऊन ती जात मंदिरास
उन्हाचा प्रखर ताप न साहूल – बालिका दमून जाई, गमे ४

तप्त धुळीमाजी भाजताती पाय – म्हणुनी ती काय जाई वेगें
वेणींतील परी गुलाबाचें फूल – पडले मळूल होऊनीयां
केंधवां पडलें फूल तें गळून – राहिलें न भान बालिकेला
आगींतून जैसें जावें फोफाट्यांत – तैशी झाली गत फुलाची त्या ५

बरवा न ताप उन्हाचा वाटून – घेतलें उड्डाण धुळीमाजी
अभागी गुलाब झाला स्थानभ्रष्ट – धुळींतील कष्ट सोसावया
गुलाबाची जात आधींच नाजूक – तयांत ही एक शिक्षा तया
असहाय स्थिती फुलाची बघून – द्रवलें मन्मन तयावेळी ६

धुळींतून तया काढावें बाहेर – म्हणूनी मी कर पुढें केला
बुडत्याला जसा काडीचा आधार – माझा तसा कर गुलाबाला
तोंच माझ्या मनीं पातला विवेक – 'परस्पर्शदुःख' द्यावें न त्या
परमणीच्या केशगुच्छांतील – कासया मी फूल उचलावें ? ७

मानवी गुलाब असे असहाय – असतील काय जगामाजी ?
भाळींचा चंद्रमा होतां स्थानभ्रष्ट – वैधव्याचे कष्ट फुलांना त्या
अशी जर फुलें वैधव्यधुळींत – कोमेजुनी अंत पावतात
समाजानें तयां कां न द्यावा हात ? – शिरीं वज्राघात होतो काय ? ८

अभागी हीं फुलें वैधव्य धुळींत, – कैची समाजात सुधारणा ?
समाजाची कृती असतां कठोर – फुलांचा उद्धार कैसा व्हावा ?

अभागी फुलांचें पाहूनिया दुःख – करी डोळेझांक समाज हा
देवा ! तूंच वाली अभागी फुलांचा – प्रतिपाल त्यांचा तूंच करी ९

गुलाबाचें फूल पायधूळींतून – झणीं उचलून घेतले मीं
निंदकांची पर्वा कासया मी करूं – वृथा भीति धरुं जगाची कां ?
हळूच तयाचें घेऊन चुंबन – हृदयाशीं क्षण धरियेलें
पाकळ्या तयाच्या दोन आल्या खालीं – आनंदाश्रु ढाळी मज गमे १०

'विविधज्ञानविस्तार' जून १९३१

## 'कवीचा आनंद' दिंडी

हर्ष कविला रति–मीलनांत नाहीं
सृष्टि शोभा अवलोकनांत नाहीं
मोद नाहीं स्मित शिशूचे पहातां
काव्य प्रसुतीचा हर्ष कविस मोठा ॥१॥



# कवि आणि कांता (दिंडी)

भर्जरीचे नव शालु पांघरून
अलंकारांनी देह भूषवून
शिरीं गजरे घालून चमेलीचे
थवे होते पथिं जात सुंदरींचे १

गृहिणि माझी हें दृष्य मनोहारी
बघत होती राहून उभी द्वारीं
युवतिगण तो मग लुप्त होय जैसा
एक सोडी ती दीर्घसा उसासा २

व्यथित मानस जाहलें तिचे फार
जाइ वदनेंदु मावळून पार
हात अपुला ती लावुनी कपाळा
उभी होती गुंफीत अश्रुमाळा ३

चरण कवितेचा मधुर गात गात
तिचा धरिला मी जाउनिया हात
आणि पुसलें कां करिसि अश्रुपात ?
काय आले तव आज गे मनांत ? ४

वदे कांता सुख नशीबांत नाहीं
तुम्हां वरुनी फसलेच पुरी बाई
भाळले मी आपुल्या कवित्वाला
म्हणुनि आपणां घातली पुष्पमाला ५

पहा गावांतिल बायका नटून
घेति फिरण्याची हौस भागवून
आणि फुटकी कवडीहि मला नाहीं
राग यावा नच कसा मला बाई ? ६

दागिनें ते राहोत दूर बाई
परी प्रेमाचा शब्द, तोहि नाहीं
सदा डोकें काव्यांत खुपसलेलें
वेड कवितेचे जणूं लागलेलें ७

आग लावा त्या काव्य पुस्तकांस
भार त्यांचा कां हवा कपाटास ?
तुम्हां कवितेचा आवरे न मोह
कां न कवितेशी लाविला विवाह ? ८

क्षोभ भार्येचा शांत करायास
मला व्यावें बहु लागले प्रयास

तिला प्रेमें हृदयाशि घेउनी मी
गोष्ट तिजला कथियली एक नामी ९

"कवी मी हा प्रख्यात कलावंत
आणि माझे तूं काव्य मूर्तिमंत
तुझा प्राणेश्वर होइ कीर्तिमान
तुला याचा पाहिजे स्वाभिमान १०

सुवर्णाचे तुज अलंकार द्याया
चौर्यकर्मे वद जाउं का कराया ?
किती कथणें छेडुनी हृदय-तार
आर्यस्त्रीचा 'पति' हाच अलंकार ११

काव्य संपत्ती विपुल ही मदीय
अधिक आपणांला हवें सांग काय ?
काव्यमय हा संसार रुचिर माझा
त्यांत राणी तूं, मीहि तुझा राजा १२

३०-६-१९३२

## 'देणगी' (वृत्त:- अभंग)

नको अलंकार देह भूषवाया
नको पांघराया शालजोडी

श्रीमंतीच्या मला नको सुखसोयी
गरीबांना बाई काय त्याचें ?

मनानें श्रीमंत सदैव असावें
हेंच एक ठावें गरीबांना

आचरावी सदा समाधानी वृत्ती
सुख आणि शांति त्यांत असे

देवरायें दिला मला अलंकार
विश्वाहूनी थोर मोल ज्याचें

चिंतनांत ज्यांच्या मला स्वर्ग सात
असे प्राणनाथ देव माझे

गरीबीचा जरी माझा हा संसार
सुख अनिवार यांत मला

अपेक्षा न मला हिऱ्या-माणकांची
वृथा आस त्यांची धरूं कां मी ?

नका मला देऊं पैठणी भर्जरी
लोभ कां अंतरी धरूं तिचा ?

"देणगी" तुम्हाला जर द्यावयाची
पुडी कुंकवाची द्यावी एक

'स्त्री' जानेवारी १९३४

## 'ऐक्याचा अभाव' दिंडी

चंद्र, तारे, रवि नभःप्रांगणात
स्नेहभावांकित सुखे राहतात
निसर्गांतहि दिसुनि ये ऐक्यभाव
परी संसारीं तयाचा अभाव ॥१॥

'मुलांचे मासिक' मे १९३२

# पारखी हिंदभूमि जाहली

[ नोकरी निमित्त कवि द. ग. जयवंत यांना सीलोंन येथें जाणें भाग पडले; मायभूमीच्या प्रेमानें कोलंबो येथें त्यांनी हे गाणें लिहिलें ]

गुलामगिरिची लोहशृंखला चरणी मम गुंतली
पारखी स्वतंत्रता जाहली
पोटास्तव या देशांतर मज करावया लागलें
द्विधा मन्मानस हें जाहलें
सोडुनि भारत सिलोन येथें मज लागे यावया
कसोटी हृदयाची घ्यावया
चाललो जेधवा सोडुनि मुंबापुरी
आंसवें दाटली लोचनांत सत्वरी
हृदयाचे चाले स्पंदन खालींवरी
मित्र, आप्तगण, बंधू, कांता, सुता दूर राहिली
पारखी हिंदभूमि जाहली ॥१॥

अफाट सागर स्वैर घालितो धिंगाणा भोंवती
मधें हें सिलोन इवले किती ?
इथेच भूपति रावण होता आनंदे नांदला
पूर्विची लंका म्हणती हिला

सीतामाई इथेच होत्या अशोक–वृक्षातळीं
पूनित सिलोन–भू जाहली
“ती पूण्यभूमि मम निवास--स्थळ जाहलें”
या रुचिर विवेकी हृदय पूर्ण रंगलें
खचित हें आज मन्मानस बहु तोषलें
हाय ! परी मज आज जाहली हिंदभूमि पारखी
टोंचणी मनास हीं सारखी ॥२॥

इतस्ततः गिरिवरी पसरले मळे चहाचे किती
खरोखर कुंठित होते मती
नारळिच्या विस्तीर्ण बघुनि या बागा चोंहींकडे
स्मिमित हें चित्त होइ बापुडे
सिलोन भूवरि करी निरंतर कृपा वरुण--देवता
विनटली विभवें ही तत्त्वतां
किति नयन--मनोहर निसर्ग शोभा इथें
वाटते रहावें अवलोकित कौतुकें
हें नंदनवन परि मजला वाटे फिके
जोंवरि माझ्या हिंदभूवरी पाय न मी टेकला
नसे स्वारस्य कशांतहि मला ॥३॥

‘समाजसेवा’ दिवाळी–विशेषांक

# कळी आणि कवि

( वृत्त :- पृथ्वी )

कळी उमलते, परी परिमळें जनां तोषवी
जगा हंसवुनी अकालि मृत पावते या भवीं
" परार्थ अमुचे असे खचित अल्प हे जीवन "
हळूंच वदली कळी मधुर काढुनीया स्वन ॥१॥

कवि स्व--प्रतिभाबळें रसिकवृंद संतोषवी
उदास जगता सदैव रसवंतिनें हांसवी
म्हणे कवि, " परार्थ जन्म अमुचा जगाभीतरी,
जगास करुं ज्ञानवंत नित गाउनी वैखरी " ॥२॥

'सह्याद्रि' मे १९३५

# 'कवीची दौलत'

दिंडी

दिली दौलत जरि कविस कुबेरानी
आणि वैभव स्वर्गिचे सुरेंद्रानीं
कवी मानिल त्या तुच्छ वैभवास
खरी दौलत त्याप्रती " शब्दकोश " ॥१॥

'मनोरंजन' एप्रिल १९३४

# हृदयाची चोरी

जातिः-- चंद्रकांत

हिरव्या वस्त्राभरणीं कोणी लाजाळू बाला
उद्यानीं पातली सुगंधी पुष्पें खुडण्याला

वातावरणीं मंजुल भरला नाद नूपुरांचा
वीणावादन करी शारदा भास होत साचा

अवयव रेखिव, सडपातळ तनु तिचा गौरवर्ण
जणुं भूवरि स्वर्गीय देवता झाली अवतीर्ण

झाली होती तन्मय बाला पुष्पें खुडण्यांत
झुडपाआडुनि रम्य दृश्य तें मी होतो बघत

खेळत होता पदर तियेचा स्वैर वायुसंगे
लवमात्र न परि सुंदरिची त्या तन्मयता भंगे

मंजुळसे परि होती बाला गोड गीत गात
प्रीतीसागर इकडे माझ्या उसळे हृदयांत

प्रशांतसमयीं गीतलकेरी घेत चारुगात्री
सुकुमार करें कुसुमें होती भरित पुष्पपात्रीं

भान न मज राहिलें, जाउनी हळूंच मीं तेथ
फूल गुलाबी तिच्या खोंविलें केशकलापांत !

"इश्श, काय हे गडे" बोलली करित हास्य मंद
मावेना हृदयांत तेधवां माझा आनंद

फुलें घेउनी घरीं जावया हो बाला सज्ज
गोड दृष्टिपातानें माझें चोरुनि हृदयाब्ज

'विहार' १२ मे १९३४

## 'स्फूर्ति आणि काव्य' (इंद्रवज्रा)

शस्त्राविना वीर लढेल कैसा ?
कष्टाविना साध्य न होत पैसा
पंखाविना पक्षि उडे न व्योमीं
स्फूर्तीविना काव्य लिहूं कसें मी ? ॥१॥



# प्रतिकार

७०८०३ काव्य
२११२ 2·2·63

(चाल:–नृपममता रामावरती)

स्वातंत्र्याकरितां आत्मार्पण करण्यास सज्ज झालेल्या वीरास त्याची पत्नी प्रतिकार करिते, त्यावेळीं तो म्हणतो:—

दास्याची जाणिव होतां–स्वातंत्र्य-गर्जना झाली–भारतीं
परवशतेची कटु निद्रा–जाउनी मानवा आली–जागृति
दुर्दैवि मायभूमीतें–राहिला न कोणी वाली–संप्रती
बघ करुण–हिचें तूं वदन–करित ही रुदन
म्हणे मज तार–मजसाठीं तव अवतार–राजसा १

स्वातंत्र्य-समर घनघोर–चालला पहा भंवतालीं–लाडके
हे माझे बांधव सारे–साह्यार्थ मारिती हांका–सारखे
रणशिंग लागलें वाजूं–दृढ मिठी सोड ही आतां–लाडके
कां वृथा–रोधिशी पथा ?–यत्न तव अतां
व्यर्थ ठरणार–मज करूं नको प्रतिकार–प्रियतमे २

दुर्दैन्य मायभूमीचें–पाहुनी हृदय हें माझें-फाटतें
शृंखला पारतंत्र्याची–तटतटा त्वरें तोडावी–वाटतें
त्वत्प्रेमापुढती कांते–कर्तव्य श्रेष्ठ मज आतां–वाटतें
हा काल,–कीर्ति-तेजाल–आण झणिं ढाल
आणि तलवार–मज करूं नको प्रतिकार–लाडके ३

धडधडाट या तोफांचा–आम्हां वीरांना वाटे–मंजुल
खणखणाट तरवारींचा–आम्हां वीरांना वाटे–मंजुल
ध्वनि गंभिर रणवाद्यांचा--आम्हां वीरांना वाटे--मंजुल
तनुवरी–भूषणें खरीं–मिळति संगरीं
अम्हां जीं प्यार–मज करूं नको प्रतिकार–लाडके ४

तव मृदुल करांचा पाश–प्रतिसारुन जातो आतां–धांवत
पडतां ध्वज सावरण्याला–समरांगणि राहिन अरिशीं–झुंजत
परि पाहिन मरतां मरतां–मी स्वतंत्र माझा देश--भारत
स्वर्गांत--घ्यावया गांठ--तुझी मग वाट
खचित बघणार--परि करूं नको प्रतिकार--संप्रती ५

'लोकमित्र' ऑगस्ट १९३१

# समाज कंटकास—

( वृत्त :- अभंग )

एकाद्या समाजकंटकानें जर भावनावश कवीवर निरर्थक टीकेचा शाब्दीक प्रहार केला, तर कवीची ओजस्वी प्रतिभा न उफाळेल तरच नवल.

भावपूर्ण गोड काव्य लिहायाचे
येरा--गबाळाचे काम नोहे
असावे लागते ज्ञान तयासाठीं
कीर्ति न ये पाठी आपोआप
तपश्चर्या हवी काव्य--लेखनास
काय निर्बुद्धास कथावें मी
कर्तृत्व अंगात असावें लागते
मोल त्याचे ज्ञाते जाणतात १

श्वानाचे भुंकणे जरी वारेमाप
गजराज धूप घालीत ना
वादळाचा होई प्रखर प्रहार
हिमालय स्थिर असे परी
झांकण्याचा केला जरी अट्टाहास
कस्तूरीचा वास लपेल कां ?
छाटीतां तो तरू वाढतो जोमाने
तसे माझे गाणें जन्म घेई २

वृत्ती तुझी आहे कूपमंडूकाची
खंत धरी याची जरा तरी
खोलीमाजी तुझे विश्व सामावलें
जन दुरावलें म्हणोनिया
विशाल असावा सदा दृष्टीकोन
जगाचे तें मन जिंकावया
मानव धर्माचा करी तूं अभ्यास
जगाचा विश्वास संपादाया ३

शाहिराची थाप डफावरी पडे
क्रांतीचे चौघडे वाजतात
कवीची प्रतिभा जेव्हां उफाळते
तेव्हां राष्ट्रगीते येती जन्मा
लेखकाची जेव्हां स्रवते लेखणी
क्रांति राष्ट्रांतुनी संभवते
बाष्कळ ते तुझे निरर्थक बोल
कवडीचे मोल नाहीं ज्याला ४

# हृदयवल्लभे !

पाजळ तव ती हृदयवल्लभे ! मधुर हास्यचांद्रिका
अवलोकूं दे तुझ्या रुचिर त्या धवल-दंत-मौक्तिकां
तांबुस तव मृदु गालावरही अवलोकूं दे खळी
विलग करीं तव अधर-पाकळ्या, फुलुं दे जीवन-कळी

नाजुक तव तनुलतिका, त्यावर दोन चिमुकलीं फुलें
प्रणयोन्मादक यौवन दाविति बुरख्यांतुन आपुलें
कां सांवरसी वरचेवर हा तलम तुझा अंचल ?
आजच कां ये दिसून सखये ! वृत्ति तुझी चंचल ?

मधुर मोहनी घालुन अपुली जिंकिलेस तूं मला
कुणी शिकविली हृदयवल्लभे ! अजब तुला ही कला ?
मन्मानस-दर्पणीं पाहतां त्वदीय रुचिराकृति
कां न पडावी या जगताची सांग मला विस्मृति ?

अवलोकुनि तुज मदीय कविता स्फुरूं लागते, पण
काव्य-लेखनीं अल्पकाळ तव अंतरेल दर्शन.
म्हणुनी हृदयेश्वरी ! न घेतों हातीं मी लेखणी
मज सारस्वत-न्याय-मंदिरीं दोषी ठरवो कुणी

रुक्ष वाळवंटांत कंठिलें जर आपण जीवन
तव सान्निध्यामधें परी तें मजला नंदनवन

अथवा चंडांशुने प्रखरता असह्य केली जरी
तव सानिध्यामधें चंद्रिका शीतल मज ती तरी

मुखावलोकनिं तुझ्या मिळे मज स्वर्गांतिल चारुता
मदीय जीवन तूंच, तुजविणें जगत शून्य सर्वथा

'विहार' १६ जून १९३४

★

## 'चुंबनाचें ऋण'

अभंग

माहेरीं जातांना घाईघाईमध्यें
चुंबन तूं माझें घेतलेंस
मजपासूनीया गेलीस तूं दूर
जीवा हुरहूर लावूनियां
प्रमुदित माझें चित्त होय भारी
प्रणय--बाजारीं ऋणको मी
चुंबनाचें ऋण मजवरी आज
परी तें सव्याज फेडीन मी ॥१॥

'विहार' २४ जून १९३३

# 'जय जवान जय किसान'

आपत्तींचा भार शिरावर
भारत-माता होई जर्जर
बिकट अवस्थेंतुनी जावया
दे देवा वरदान, जय जवान जय किसान १

राष्ट्रविघातक जमले सारे
अस्तनींतले प्रखर निखारे
गाफिल राहूं नको जवाना
ढळूं न दे अवसान, जय जवान जय किसान २

शेतकऱ्याला नसे बापुडी
रहावयाला जीर्ण झोंपडी
परि देशास्तव उभा ठाकला
विसरुनि भूक-तहान, जय जवान जय किसान ३

तोंड द्यावया पर-चक्राला
जवान असुचा सिद्ध जाहला
या भारत देशाची अपुल्या
राखायाला शान, जय जवान जय किसान ४

संप, दंगली, अन सत्याग्रह
करुनी, दावो कुणी दुराग्रह

जवान अमुचा परी निरंतर
दाविल पूर्ण इमान, जय जवान जय किसान ५

शेतकरी हा जरि निष्कांचन
असुं द्या, असले जरि हें लांछन
कष्टवुनी तनु, या देशाची
उंचाविल हा मान, जय जवान जय किसान ६

स्वातंत्र्याचा नंदादीप
सदैव ठेवायाला तेवत
जवान अमुचा स्वप्राणाचें
करीलही बलिदान, जय जवान जय किसान ७

शेतकरी हा आणि जवान
राष्ट्र-रथाचीं चाकें दोन
उन्नतिच्या यशमंदिराकडे
नेतिल हीं गतिमान, जय जवान जय किसान ८

'मार्मिक'



# तूं आणि मी

(सुनीत)

भीरू वृत्ति तुझी सदैव असुनी, माझी सदा निर्भय
देखावा कटु पाहतां तनु तुझी कां होतसे कंपित ?
माझा स्पर्श तुला घडे, तव तनू हो तोंच रोमांचित
पाषाणापरि मी असून मनही माझें असे निर्दय
तूझे मंजुल गीत ऐकुनि अहा लाजे मनीं कोकिळा
माझा कर्कश शब्द ऐकुनि भयें हीं धांवती बालकें
मातें कोणि न वक्रदृष्टि करुनी मार्गांत पाहूं शके
न्याळाया मुखचंद्रमा तव, पथीं कां भृंग चौबाजुला ?
आश्चर्ये करितेस तूं कधिं कधीं गालांत मंदस्मित
मी तों हास्यरवें सदैव छळितो आळींतल्या या जना
सौंदर्या तव पाहुनी गगनिंच्या हो अप्सरा विस्मित
औदार्यें जणुं देणगीच प्रभुनें वाटे दिली ही तुला

*         *         *

माझा राकट देह, अन् तनु तुझी पुष्पापरी कोमल
ऐसा भेद परस्परांत न कळे कां ठेवितो ईश हा ?

'वसुंधरा' एप्रिल १९३१

# सौ. निर्मलेस पत्र

[ वृत्त :- साकी ]

कवि जयवंत हे सिलोन येथें दीर्घ मुदतीसाठीं वास्तव्य करीत असतां, त्यांनी मुंबईस आपल्या पत्नीस भावनावेगानें लिहिलेलें पत्र.

प्रिय कांते निर्मले ! बघुनि हें माझे विस्तृत पत्र
गृहव्यवसाया सोडुनि, हांसत बसशिल तूं क्षणमात्र
थट्टा नोहे, कथितो तुजला, मर्म यांतले जाणी
या हृदयाच्या गाभाऱ्यांतुन प्रस्फुरते जी वाणी
क्षमा करी निर्मले, किती मी दुष्ट आणि निष्ठूर
तुला आणि मंदास सोडुनी आलो इतुक्या दूर
तुझ्या मनींच्या मृदुल भावना पूर्ण जाणतो मीही
पत्रामाजीं लिहावयाचें कारण अगदीं नाहीं
वैवाहिक जीवनीं न रमलो पुरते एकहि साल
परस्परांमधिं उभा राहिला विरह–गिरीच विशाल
गुलामगिरिची मोहक, सुंदर कट्यार ही सोनेरी
दिसावया अति सोज्वळ, परि ती हृदया पार विदारी
नको निर्मले हताश होऊं, धीरहि सोडुं नकोस
करुणा येइल एके दिवशीं प्रभूस अपुली खास

काभिन्न काळ्या अवसेनंतर धवल पौर्णिमा रात

तशीच विरहामागुन अपुली होइल प्रेमळ भेट

"एकोणिसशे पंचेचाळिस, दहा जून, रविवार"

दिन हा माझ्या स्मरणामधुनी कधींहि न जाणार

निद्रावश ती पाळण्यांतली मंदा देखुनि साच

मंदा नोहे परस्परांतिल प्रेमाची प्रतिमाच

मुका घ्यावया तिचा गोडसा जरा वांकलो खालीं

अश्रुबिंदु मम दोन ठिबकलें तोंच तियेच्या गाली

मनामधें त्याक्षणीं दोषही दिधला परमेशास

"कां दृढ इतुका देवा करिसी कोमल मायापाश"?

बरे, कळावें कसें चिमुकल्या जीवा त्या निष्पाप ?

"कर्तव्यास्तव आज आपुला दूर जातसे बाप"

असो, निर्मले ! नको कल्पना मनांत त्या आणाया,

आणि भावनाविवश मनाची शांति लवहि ढळाया

"मजसंगे कष्टांतहि येथें रहावया तूं राजी"

इत्यादी मजकूर वाचिला त्वदीय पत्रामाजीं

परंतु कांते, सिलोन म्हणजे पुणें-मुंबई नाहीं

सिलोनबाबत तुम्हां कुणासहि नसे कल्पना कांहीं

परकी भाषा, परकी जनता, परकी रीतरिवाज

सांग निर्मले कसा बसावा येथें अपुला बोज ?

सदैव त्यांतुन प्रवासांत मी, जणुं काय मुशाफीर
घरांत तुजला कोण निर्मले द्याया येइल धीर ?

नको न्हावया येथें तुमचे दोन जिवांचे हाल
मुंबापुरिला घरींच अपुल्या कांते ऐस खुशाल

मात्र छबकड्या मंदाची तूं नीट काळजी वाही
नलगे कथणें तुजला, कारण मूर्तिमंत तूं आई

समाचारही कळवित जा तूं पत्रानें सकलांचा
तसाच ठेवी मान घरामधिं दादांचा-वहिनींचा

कमा, विभा, अन इंदू, मंदा, बाबा, कुसुमहि, पुष्पा
आशीर्वच मम बागडणाऱ्या हंसणाऱ्या या पुष्पां

बरे निर्मले ! जाशिल जेव्हां तूं अपुल्या माहेरी
नमस्कार काकींस सांगुनी, कथी खुशाली सारी

ता. ५ ऑगस्ट १९४६ तुझे

**अप्पासाहेब**

# “ पौर्णिमेच्या चंद्रास ”

[ चाल :– भूपती खरे ते ]

तव रजनी राणी काळा बुरखा ल्याली
जणुं नाथदर्शनें चित्तीं लज्जित झाली

स्मितमुखें गगनिंच्या रंगमहालामाजी
उधळिसी तारका–सुमनें कां तूं ताजीं ?

तव आगमनें कां सागरास ये भरती ?
त्वद्दर्शन घडतां कां शिशु हर्षित होती ?

पाहुनी तुला, शिशु जननीप्रति वदतात
“ डिकविलें नभाला कुणी रुपेरी ताट ?”

कवि देती उपमा तुझी रमणिवदनातें
तूं खरोखरिच अति भाग्यवान, मज वाटे

सांवळा डाग तव गौरशा तनूवरिल
जणुं रमणीगालीं एकच सुंदर तीळ

निद्रावश बघुनी सृष्टि चराचर सारी
कां प्रीति--खेळ खेळसी नभामाझारीं ?

क्षणिं ढगाआड अन क्षणीं ढगाबाहेर
कां वृथा खेळसी लपंडाव हा स्वैर ?

कां झरोक्यांतुनी बघसी मानव--लीला--
चोरुनी ? न ज्या तुज योग्य मुळीं बघण्याला
धांवसी असा विधुराया--कां बरे ?
तूं मधेंच लपसी ऐसा--कां बरे ?

किती खेळणार तूं नभःप्रांगणामाजी ?
तूं खेळ स्वैर, स्फूर्तिही खेळते माझी

'विविधज्ञान विस्तार' जुलै १९३१



# सूर्यास्तानंतर

[ चाल :- चंद्रकांत ]

सूर्यास्तानंतर कांहीं वेळ पश्चिम दिशा लाल असते. असे चित्तवेधक दृश्य पाहून, खालील विचार मनांत आले तर नवल कसलें ?

काय अस्त-दुर्गावरती हा संगर सुरुं आहे
मृत वीरांच्या रुधिराची जणुं सरिता ही वाहे
रक्त सांडले रणभूमीवर हे जागोजाग
म्हणुन काय हा लाल दिसतसे पश्चिमदिग्भाग ?

अथवा विजयी सैनिक घेउनि रक्तध्वज हातीं
उभे ठाकले काय प्रमोदे पश्चिमदिक्प्रांतीं ?
किंवा लागे नभो-मंडळा प्रचंड ही आग ?
म्हणून दिसतो काय लाल हा पश्चिमदिग्भाग ?

लाल शाइचे पात्र घेउनी स्वर्गीची बाला
प्रणय--पत्रिका लिहीत होती अपुल्या नाथाला
तोंच रवीच्या चरणस्पर्शें पात्र पडे खाली
पश्चिमेस ही म्हणून चढली का इतुकी लाली ?

कीं संध्यादेवीनें भरिला मळवट निजभाळीं
पश्चिमदिक्प्रांतावर दिसते तीच काय लाली

विडा प्रीतिचा अथवा खाते ही संध्यारमणी ?

लालपणा हा म्हणून दिसतो काय तिच्या वदनी ?

पश्चिम-दिग्वधुनें पांघरली अहा लाल शाल

अस्तादिशा ही म्हणून दिसते का इतुकी लाल ?

स्वागतार्थ रजनीनाथाच्या संध्या-रमणीनें

काय गुलाबी फुलें उधळिली प्रेमभावनेनें ?

डामडौल मंगल कार्याचा काय दाखवाया

पश्चिमदिग्मंदिरीं लाविल्या लाल पताका या ?

१९-१२-३१



## कसें होईल ?

जातांना पथिं तोंड-ओळख जरा
झाली तुझ्याशीं कुठें
तों तूं रोखियलें बळें भुवइचें
माझ्यावरी कामठें
आतांपासुन एवढी जर तुझी
झाली तयारी गडे
झाली ओळख दाटशी तर कसें
होईल माझे पुढें ?

**भ. श्री. पंडित M. A. नागपूर**

## 'नाजुक चिंता'

श्री. भवानीशंकर श्री. पंडित यांच्या 'कसें होईल ?' या वरील कवितेस उत्तर

चिंता नाजुक एकढ्यांतच गडे
वाहूं तुम्ही लागलां
कैसे होइल बाइ स्नेह दृढसा,
झाल्यावरी आपुला ?
माझ्या दृष्टिशरें अचूक इतुके
घायाळ झालां जर
व्हावें या जगतांत बाइ तुमचे
कैसे विवाहोत्तर ?

'विश्ववाणी' मे १९३३

# निर्माल्य झालीं फुलें

(सुनीत)

विश्वाच्या अतिरुक्ष विस्तृत अशा या वाळवंटावर
देवा ! कां दिधलींस टाकुन अशीं तूं हीं अभागी फुलें ?
कां केलेस कठोर चित्त सखया ! वज्रापरी आपुलें ?
मायेची अपुली तयांवरि न कां तूं घालिसी पांखर ?
कां आम्ही तरि दोष नित्य तुजला द्यावा बरें ईश्वरा !
आम्हां दृष्टि असूनहि जगतिं या झालों अम्ही आंधळें
नाहीं मानस-मेरुमाजि अमुच्या प्रेमामृताचा झरा
पुष्पांची नच आर्त हांक अमुच्या कर्णेंद्रिया आकळें
झंझावात सुटून वृक्ष पडलें ईशप्रकोपामुळें
आतां ढाळित अश्रु हाय ! बसल्या दुर्दैवि साऱ्या लता
मूर्तीवीण भयाण मंदिर दिसे, हो लुप्त मांगल्यता
होती हांसत काल जीं सकल तीं निर्माल्य झालीं फुलें

* * *

पुष्पांची अवहेलना निशिदिनीं होतां जगामाजि या
कां त्यांची लवमात्र येत न तुला हिंदूसमाजा ! दया ?

'यशवंत' जून १९३२

# स्फूर्ति आणि निसर्ग

( वृत्तः—वसंत तिलका )

वर्षाऋतूंत चपला चमके नभांत
        व्योमांतुनी सलिल-मौक्तिक-वृष्टि होत
तेणें तुडुंब भरती तळिं, वापिकाही
        दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही        १

मेरूमधून सरिता पथ आक्रमीत
        प्रक्षुब्ध आब्धिप्रति येउन भेटतात
हा सात्त्विक प्रणय मोद मनास देई
        दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही        २

चारी दिशा दहिवरांकित जाहल्या या
        व्यक्ती न येत मुळिं त्यांतुन ओळखाया
सूर्यप्रभा परि धुकें विलयास नेई
        दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही        ३

हा गालिचा पसरिला हिरव्या तृणाचा
        केला तयावरि सडा दंव-मौक्तिकांचा
कां ही नटून वन-सुंदरि आज राही ?
        दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही        ४

येतां समीप ऋतुराज, तरूंतरूंस–
ये पालवी फुटुन, हर्षवि जो मनास
तत्स्वागतार्थ जणुं कोयळ गीत गाई
दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता हीं ५

हे तुंग डोंगर विशाल सभोंवताली
फेकी प्रभा प्रथम त्यांवरि अंशुमाली
मासे विहार करिती सरिता-प्रवाहीं
दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही ६

हा अंबरांतिल सुधाकर पौर्णिमेचा
मेळा तसा रुचिरसा हिम-तारकांचा
आहे निरंतर जनांप्रति मोददायी
दे काव्यस्फूर्ति मज दिव्य निसर्गता ही ७

‘विविध ज्ञानविस्तार’ एप्रिल–मे १९३२



# लो. बाळ गंगाधर टिळक यांचें पुण्यस्मरण

(वृत्त :– पृथ्वी)

नभीं चमकली भयानक सतेज सौदामिनी
प्रचंड घनगर्जना श्रवुनि कांपली मेदिनी
तदा वरुणदेवता रुदनही करुं लागली
विलाप रव काढितां वसुमती जणूं भागली १

हळूंच वदले कुणीतरि मला तदा स्फुंदत
'अहो भरतभूमिचा तनय लाडका हो मृत'
कुठार कटु पातली खचित भारताच्या शिरीं
तरीच दिसला निसर्ग मज खिन्नसा अंतरीं २

स्वदेशजननीचिया तुम्हि गळ्यांतला ताइत
त्वदीय विरहें कशी न बसणार ती स्फुंदत ?
स्वयें उतरलांत राष्ट्र-समरांगणीं वाग्विरा !
अनाहुत वृथाच स्वर्गगमनार्थ केली त्वरा ३

सदैव मनिं खिन्नसा बघ तुझा महाराष्ट्र हा
'बघेन गतवैभवास कधिं' हीच ज्याची स्पृहा
तुम्ही खचित 'लोकमान्य', बनलांत राष्ट्राग्रणी
धुरीण निज भारतास न असा मिळाला कुणी ४

स्वराज्यजननी स्वतंत्र अपुली करायास ही
निरंतर तुवां तनू झिजविलीस कारागृहीं
गुरुत्व तुज राजकारणधुरंधराभ्यंतरीं
खलां जरब द्यावया प्रसविलास त्वां 'केसरी' ५

प्रसादयुत ती रसाळ तव ऐकतां वैखरी
अधिष्ठित जणूं त्वदीय रसनाग्रि वागीश्वरी
सरस्वतिगृहांतला खचित तूंच वाचस्पती
दिसे न मज वाक्पटुत्व तुजसारखे संप्रती ६

विचारसरणी प्रगल्भ तव अग्रलेखांतली
खरी कुशलता प्रशंसनिय युक्तिवादांतली
विलक्षण धडाडि ती त्वदिय राष्ट्रकार्यातली
स्मरून गतगोष्टि या नयनिं आंसवें दाटलीं ७

तुम्हांविषयिं वाटतो मज सदैव अत्यादर
म्हणून करितों मुदें कवनहार हा सादर
त्वदीय स्मृतिनें सदा हृदय पावते स्पंदन
निरंतर मदीय बाल टिळका ! तुला वंदन ८

'ज्ञान मंदिर' जुलै १९३६

# पश्चात्ताप

(सुनीत)

मूढत्वें जननी ! तुला कितितरी मी वाक्‌शरें टोचिलें
'तूं माता सुत मी तुझा' न गणुनी लाथाळिलें कैकदां !
माझे हे अपराध क्षम्य करुनी लक्षावधी सर्वदा
तूं बोधामृत पाजिलेंस अपुल्या चित्ता करूनी खुलें।
नाहीं बालपणांत आलि कळुनी आई ! तुझी थोरवी
मिथ्या मीं छळिलें तुला, तुजवरी वाक्बाण सोडूनियां
आतां मात्र कळे तुझेविण कुणी नाहीं मला या भवीं
आत्मप्रौढि तरी वृथा तुजपुढें आई ! करूं कासया ?
नाहीं त्वच्चरणांबुजावरि कदां हें शीर्ष मी ठेविलें
वात्सल्यें परि तूं सदैव मजला देतेस आशीर्वच
'माता दैवत थोर' आज कळलें मूढास या माउली !
आतां विश्वहि तुच्छ हें तुजपुढें वाटूं मला लागलें

० ० ०

पश्चात्ताप अतां न साहत मला, झालों असे हिंपुटी
कैची लाज तुझ्या पवित्र चरणां घालावयाला मिठी ?

'वऱ्हाड शाळा पत्रक' मे १९३१

# अमावास्या

(सुनीत)

ही काळी रजनी भयाण इतुकी कां दर्शवी शांतता ?
वाटे कीं रजनींभये वसुमती ही होय निद्रावश
प्राणीमात्र तसेच निर्झर, नद्या, वृक्षादि साऱ्या लता
घेवोनी व्रत मौन व्यक्त करिती चित्तांतले साध्वस
होवोनी भयभीत कांपति जणूं या तारका अंबरीं
भीतीनें हिमचंद्रमाहि उदया येऊं शकेना नभीं
भूतांचे परि नृत्य लोक ह्मणती चाले स्मशानांतरीं
कां ऐसा न कळे निशीथसमयीं चाले तयांचा विधी
काळी चंद्रकळाच नेसुनि जणूं ही पातली यामिनी
सारें विश्व तिला 'कुहू' म्हणुनिया संबोधितें वाटतें
ऐशा श्यामल यामिनीस बघुनी भीति हृदीं दाटते
कोणाचे असते कसें हृदय हे सांगू शकेना कुणी

० ० ०

ईशा ! सांप्रत भारतींहि अमुच्या आहे क्षपा श्यामला
केव्हां शीतल तो हिमांशु गगनीं येईल ? ठावे तुला

'मनोरंजन' आगस्ट १९३२

# मराठी मना !

तुझ्या पूर्वजांच्या यशाचे पवाडे
नको गात राहू मराठी मना
तुझे तूंच कर्तृत्व दावी जरासे
पुरी होय जेणें मनोकामना
जमाना असे आजचा हा निराळा
मना ! कष्टदायी असे हा क्षण
जसा वात वाहे तशी पाठ देणें
विचारी मनाचें असे धोरण ॥१॥

वृथा नोकरीचा नको ध्यास घेऊं
स्वतःचाच धंदा बरा त्याहुनी
गुलामींत वेंचून आयुष्य सारे
मना ! साधिशी काय या जीवनीं ?
मराठी मनाचा असा कोंडमारा
विवेकी मनाला न तो साहणें
पुढे टाक पाऊल तूं साहसानें
नको रे नको आजचे हे जिणे ॥२॥

पहा द्राविडी आणि सिंधी जमाती

खडी पाय रोवून झाली इथें

परी चाड नाहीं मराठी मनाला

सदा दृश्य हें पाहती कौतुकें

मराठी मना ! ताठ ही मान व्हावी

नको मानहानी इथें व्हावया

तुझी टाक तूं पाउले दक्षतेनें

यशाचा तुझा मार्ग गांठावया ॥३॥

'मोडू परी ना कधीं वांकणारा'

अशी कीर्ति आहे तुझी उज्वल

मराठी तुझा हा असे थोर बाणा

तुझी न्याय नीती असे सोज्वल

धनी आज आहेस भावी पिढीचा

नको शाप घेऊस त्यांचा वृथा

तुझे आजचे काय कर्तव्य आहे

मना ! जाणिले पाहिजे सर्वथा ॥४॥

'सुयश'

# धुकें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
७८८६३ वि: काव्य
२९९२ नों दि:

( चाल :– चंद्रकांत )

झुगारून आपुला कुठेंतरि मृदु शालू काळा
धवल वसन लेवूनी नटली वसुंधरा बाला

गगन–मंदिरीं यज्ञ लाविला देवांनीं थोर
चहूंकडे कोंदला तयाचा काय धवल धूर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे अ. क्र. २८५९४ (स्थळ प्रत)

अथवा वात्सल्यप्रेमानें विश्व–माउलींनी
धवल वस्त्र पसरुनी आपुले झांकियली अवनी ?

घालित असतां स्वर्ग–सुंदरी अपुली रांगोळी
स्वकरस्पर्शें रांगोळीचें पात्र पडे खालीं

तोंच जाहली चहूंबाजुला धूसर ही अवनी
रांगोळी ती काय पसरली या वातावरणीं ?

अथवा कोणी अंबरांतुनी पिंजुन कापूस–
फेंकुनि दिधला जगतावरि या मौज पाहण्यास ?

कीं देवांनीं रिझवायास्तव मंगलमय सृष्टी
धवल फुलांची आकाशांतुन ही केली वृष्टी !

हाय ! परी या मधेंच कसल्या तारा सोनेरी
पूर्वेच्या क्षितिजांतुन करिती जगतावर स्वारी ?

हंसत हंसत हा डोंगर चढुनी वर आला कोण
दावित अपुली प्रभा पातला अहा बाल-अरुण !

' वऱ्हाडशाळा पत्रक ' जानेवारी १९३२

## अनभिज्ञ

प्रयत्नें वाळूचे कण रगडितां तेलहि गळे,
तृषार्ताची तृष्णा मृगजळ पिऊनीहि वितळे,
सशाचेंही लाधे विपिन फिरतां शृंगहि जरी;
परंतू मूर्खाचें हृदय धरवेना क्षणभरी.

—**वामन पंडित**

महामूर्खाचेंही हृदय वश येईल करितां
मृताला ही येतें भगिरथ प्रयत्नें उठवितां
अमावास्येलाही शशि उदय पावेल गगनीं
परंतू ना गोडी खचित अनभिज्ञांस कवनीं

# भाऊबीज

(जाति :- चंद्रकांत)

अहा प्रमुदिता मंगल सोज्वळ आली दिपवाळी
मधुर भावना हृदयीं स्फुरली, तनु पुलकित झाली !
दीप-मालिका चहुंबाजूला आतां दिसतील
नव्हे, गगनिच्या सकल तारका भूवरि येतील !
शरद्सुंदरी बसेल नटुनी लेवुनि शालु निळा
हर्षवील दीपोत्सव तिजला या अवनीवरला;
दिन बीजेचा बंधु-भगिनिच्या प्रीतिविकासाचा
सत् सौख्याचा, आनंदाचा, अन् मांगल्याचा
कला कुशलता रम्य ज्यामधे प्रतिबिंबित झाली
रंगावलिच्या विविध आकृति काढिन भंवताली,
भाऊराया येइल माझा, ओवाळिन त्यास
प्रीति-भाव मग परस्परांच्या कळेल हृदयास

० ० ०

किती खुळी मी स्वप्नचि केवळ बंधु-दर्शनाचे
वृथा मनोरे मनीं उभविलें तरल कल्पनांचे !
गोमंतक देविचा पुसाया परवशता डाग
स्वयंस्फूर्तिनें सज्ज जाहलें किती महाभाग !

मत्त फिरंगी नि:शस्त्रांवरि करि गोळीबार
कितीतरी जीवांची झाली कत्तल अनिवार !
आघाडीवर बंधूराया ! उभा ठाकलास
होम जिवाचा, सर्वस्वाचा क्षणांत केलास;
गगनीं विलसे बीजेची सुकुमार चंद्रकोर
प्राण ज्योत तव असेल तेथें करीत संचार !
तव आत्म्याला प्रेमभरें मी ओवाळिन आज
मांगल्याची करिन साजरी अशि "भाऊबीज"

'समाजसेवा'

★

## "धिक् धिक् तयाचे जिणे"

गेले सांगुनि नेहरू 'निशिदिनी
'आराम' नाहीं बरा'
'कर्तव्यांत सदैव मग्न असणें
हा बोध आहे खरा
जो जो कष्ट करीं तयास जगतीं
कांहींच नाहीं उणे
जो निष्क्रीय परावलंबित असे
"धिक् धिक् तयाचे जिणें"

'लोकसत्ता'

# शतायुषि करी माझ्या या पाडसा

( जाति :– बालमुकुन्द )

मम आयुष्याचा प्रवास कटु दीर्घसा
मुखचंद्र तुझा हा बघुनी, सुखमय वाटे राजसा ! ॥धृ०॥

तव तात सोडुनी गेले जग नश्वर
मजवरि कोसळला दुःखाचा डोंगर
भीषण रजनीमय मम जीवित–अंबर
परि त्यांत मला तूं गमसी बालार्कसा ॥१॥

धनदौलत सारी झाली मज पारखी
जीवास लागली तळमळ ही सारखी
या दारिद्र्यांतच आहे परि मी सुखी
सहवास तुझा नित रिझवी मन्मानसा ॥२॥

धनिकांच्या गेहीं कष्ट करिन मी सदा
तुज उणें न कांहीं पडूं द्यायची कदा
निशिदिनीं प्रार्थना करितें मी प्रभु–पदा
कीं "शतायुषि करी माझ्या या पाडसा" ॥३॥

'स्त्री' सप्टेंबर १९३३

## प्रणय-दीप

अवसेच्या तिमिरांत दीपमाला पाजळल्या
तारका या खाली आल्या १

आले नूतन जांवई भेटण्यास श्वशूराला
मोंल नाहीं आनंदाला २

लज्जावती नव-वधू बोले हळूच प्रियाला
"चला गडे फराळाला" ३

बाल-बालिका लहान लाडु, कडबुळीं खात
स्वच्छंदानें खेळतात ४

चित्तवेधक श्रृंगार केला आज युवतींनी
प्रमुदित सर्वजणी ५

भाऊराया आला घरीं, ताई तयास ओंवाळी
भाऊ ओवाळणी घाली ६

दीपांचा हा समुदाय करी तिमिराचा नाश
परी अंधूक प्रकाश ७

तुझ्या माझ्या हृदयांत जळे प्रणयाचा दीप
तेज तयाचें अमूप ८

"विविधवृत्त" १५ आक्टोबर १९३३

# पौर्णिमा कीं अमावास्या ?

( जाति :– केशव करणी )

कविः– प्रशांतसमयीं सौधावरती चंद्रप्रकाशांतरी
लाडके ! बसूं जरा क्षणभरी
प्रेमभरे चल परस्परांच्या हात घालुनी गळां
प्रीतिचा फुलवूं सुंदर मळा
विस्मृति मजला खचित जगाची पडेल मग साजणी
तुझ्या या अधरामृत प्राशनीं
अंबरी लुकलुके बघ हा तारागण
जणु उत्सुक अपुलें पहावया मीलन
ही धवल चंद्रिका करिल सुधासिंचन
पुनवेची ही धवल यामिनी मनोज्ञ प्रणयी जना
नव्हें कां रुचिर ईशयोजना ? ॥१॥

कांताः– काव्यांतिल ही भाषा बाई कळत न मजला मुळीं
म्हणा मज पाहिजेल तर खुळी
व्यवहारामधिं सदैव ठरती फोल काव्य–कल्पना
हवी तर अरसिक मजला म्हणा

पुनवेची रजनी नच बाई उचित हृदयमीलना
हंसुं नका मजला मनमोहना !
गगनिचा सुधाकर पहा तुम्हांला हंसे
मनि म्हणे 'प्रीतिचे कविस लागले पिसे'
मग हृदयमीलना तयार होतां कसें ?
कृष्णवर्णी ती रात्र काजळी हृदयमीलना बरी
प्रियतमा ! तींत खरी माधुरी ॥२॥

विश्ववाणी जुलै १९३३

# तारापतन

चालः-चंद्रकांत

निळ्या गगन-मंदिरीं नाचते अहा चंद्रकोर
कां वदनीं मंदस्मित करिते ही नटवी पोर ?
प्रमुदित दिसते स्वर्गदेवता, रजनीबालाही
निळया महालीं काय योजिला समारंभ त्यांहीं ?

रजनीबाला करीत बसली अपुला शृंगार
गळून पडला कंठांतिल तों नव-मौक्तिक हार
इतस्ततः पसरले तयाचे मणी अंतराळीं
काय तयांतिल एकच आला हा इतुका खालीं ?

स्वर्ग-मंदिर-द्वाराचें-नव-तोरण गुंफीत
रजनी बसली, मौक्तिक त्यांतिल कीं खालीं येत ?
लज्जायुवती लाजत देतां तिळगुळ नाथाला
गोंडस हातांतुन हा दाणा कीं खालीं आला ?

कीं रजनीच्या वेणींतिल हें फूल मोगऱ्याचे
वायूचा लागुनी झोत ये भूवरती साचे
स्वर्गबालिका गुंफित अपुला पुष्पहार बसली
धवल पुष्प हें एक तयांतुनि कीं आलें खालीं ?

कीं गोजिरवाणें मृतबालक मातृस्मृति होतां
गगनांतुनि पातले भूवरीं पाहण्यास माता ?
मौक्तिक-चारा गगनी खातां कुणी राजहंस
मुखांतील हा पडला त्याचा कीं खालीं घांस ?

अथवा जननी पाजित असतां दूध तान्हुल्याला
थेंब दुधाचा पात्रामधुनी हा खालीं आला ?
शयन-मंदिरीं दर्शन द्याया येइ न पूर्णेन्दु
रोहिणिनें हा म्हणुन टाकिला काय अश्रुबिंदु ?



# तुझीं फुलें

(वृत्तः-वसंततिलका)

तूं धाडिलींस कुसुमें करवीं दुजाच्या
गे यांत हेतु न कळे तव मानसींचा
कांहींच ओळख नसून परस्परांची
कैशीं फुलें दिलिस धाडुन मोगरीचीं ॥१॥

मी तोषलों तव फुलें लव हुंगितांच
जैसा सरोज-रस सेवित भृंग साच
मी हुंगिलीं सकल तीं सुमनें परंतु
मन्मानसीं सहज एकच येत किंतु ॥२॥

पुष्पें अशीं मजसि पाठविण्यांत बाले!
त्वत्स्वार्थ काय, कळुनी मज सर्व आलें
माझा असा हृदय-दुर्ग जिंकावयास
युक्ती तुवां अजब ही कशि योजिलीस ? ॥३॥

नाविन्यपूर्ण गमते तव कल्पना ही
शंका न यांत रुचिरे! तिलमात्र कांहीं
कां सांग प्रीतिवश झालिस, कोमलांगे ?
आहे अपात्र तव प्रीतिस मी शुभांगे! ॥४॥

हृन्मंदिरांत मज तूं दिधलास ठाव
राहील का तव सदैव असाच भाव
पुष्पापरी धवल त्वत्कृति मन्मनातें
देईल काय सुख ? सुंदरि, सांग मातें ॥५॥

कोमेजतील सुमनें नव हीं उद्यांच
त्वत्प्रेमलोप वद होइल का तसाच ?
माझ्यावरी जरि तुझी इतराजि झाली
पुष्पें सदैव तव चुंबिन वाळलेलीं ॥६॥

विहार २ जून १९३४



# गतभर्तृकेचे करुणोद्गार

(आर्या)

दुर्दैवानें माझा अवचित सौभाग्य-चंद्र मावळला
कष्टप्रद हें जीवन आलें नशिबांत कंठणें मजला ॥१॥

सौभाग्यतरूच्या मी शीतल छायेंत जोंवरी होतें
'वैधव्यवन्हि जाळिल अवचित' स्वप्नांत हें तदा नव्हतें ॥२॥

पतिनिधनाचा मजवरि ओढवला कटु प्रसंग दैवानें
जननिंदेच्या आतां तीव्र पराण्याच सोसुनी जगणें ॥३॥

मीच नव्हे, अवनीवरि असतिल गतभर्तृका अनेक अशा
परि या अंध समाजा अबलांची दिसतसे न हीन दशा ॥४॥

आजवरी अमुच्यास्तव चिंता किति वाहिली समाजानें ?
महिलांच्या उन्नतिची बाष्कळ कां व्यर्थ वल्गना करणें ? ॥५॥

वैधव्यान्धःकारीं धडपडतों आम्हि दीनशा गाई
द्रव न समाजास फुटे, किति हा पाषाणहृदयि तरि बाई ॥६॥

कुंकुमतिलकाविण या भालप्रदेशास पाहुनी धवल
करुणा न ये समाजा कैशी ? याचेंच वाटतें नवल ॥७॥

काबाडकष्ट करितों धनिकांच्या गेहिं, सोडुनी लाज
धिक् अमुचें हें जीवन, निद्रावश आमुचा परि समाज ॥८॥

प्रभुवीण कोण आतां आम्हां गतभर्तृकांप्रती वाली ?
औदार्य समाजाचें, कृतज्ञताही कळून ती आली ॥९॥

आली वैधव्यदशा म्हणुनी कां लेखितां अम्हां हीन ?
स्थिति करुणास्पद अमुची, सलिलाविण तडफडे जसा मीन ॥१०॥

करितां स्पर्श फुलांना, पुष्पें तीं काय व्हावीं निर्माल्य ?
अमुच्या कोमल हृदया जाचक नच यापरी दुजे शल्य ॥११॥

काय अम्ही वृक्षाचीं पक्व अशीं गलित जाहलों पानें ?
की तुडवावें आम्हां मार्गांवरि येउनी हवे त्यानें ॥१२॥

अथवा आहों आम्हीं कचऱ्यांतिल काय क्षुद्रसे प्राणी ?
कीं लोटावें आम्हां कचऱ्यासह बाजुला हवे त्यांनीं ॥१३॥

छळ कुणिहि करो अमुचा, जरि आम्ही आज हीन लाचार
परि आम्हां अबलांना प्रभुचरणांचाच एक आधार ॥१४॥

स्त्री जानेवारी १९३२

# पौर्णिमा

विशाल या अंबरीं पहा ग विशाल या अंबरीं ॥ धृ० ॥

इकडे ही मेघावली
गजगतीपरी पातली
तिकडे ती बघ लोपली शशीची स्वारी मेघोदरीं १

इवल्याशा या चांदण्या
रजनीनाथा शोधण्या
अन्योन्या करिती खुणा 'ग लपला कुठें शशी तो तरी' २

अस्मानींचें सुंदर
मणिमोत्यांचें झुंबर
जणुं तुटुनि तयाचें मणी विखुरले अहा नभोमंदिरीं ३

जणुं क्षितिजाला या निळ्या
टिकल्याच कुणी डिकविल्या
छे, शालु खडीचा निळा नेसली ही रजनीसुंदरी ४

तेजाळ शुक्र चांदणी
चमकते नभःप्रांगणी
संग्रामदेवता कुणी खचित ही लढलेली संगरीं ५

या सुनील गगनांगणीं
काढिला कणा ग कुणी ?
खचित ती देवि यामिनी कुशलता दावि कलाकूसरीं ६

पुनवेचा पूर्णेन्दु हा
किती मोहक दिसतो पहा
अवलोकितांच त्या अहा मनाला प्रसन्नता ये खरी ७

चहुंकडे धवल चांदणें
तारांचे मधु हांसणें
दृश्य हें गोड पाहणें ग म्हणजे हवीच कविवैखरी ८

ही निसर्गरमणीयता
सोत्साहे अवलोकितां
वाटते अरसिकां कळेल केंवी हिची खरी माधुरी ९

विविधज्ञानविस्तार जानेवारी १९३२

# वाक्बाण

(चालः-भूपती खरे ते)

द्या फेंकुनि मजला कंटकराशीमाजी
समजेन विपिनिच्या मी निर्गन्ध सरोजीं
मज करा उभे या रविच्या प्रखर उन्हांत
मी मानिन पूर्णेन्दुचे चांदणें शान्त

कर-चरण बांधुनी द्या फेंकुनि दर्यांत
समजेन स्वर्गिंच्या मी अमृत-पेल्यांत
रसरशित निखारे तळहातीं जरि द्याल
समजेन गुलाबाचींच फुलें हीं लाल

द्या लोटुनि अथवा मज गिरिशिखरावरुनी
पर्वा न मला, जाईन सुखें प्रभुचरणीं
कर-चरणी अथवा लोहश्रृंखला घाला
समजेन मृदुलशी हीं सुमनांची माला

मज कदान्न चारा, अथवा द्या मज वीष
मी करिन सुखें तें प्राशन, स्मरुनी ईश
यातना सकल या सहन करिल मत्प्राण
परि नकोत तुमचे हें जहरी वाक्बाण

सहविचार एप्रिल १९३२

# अरसिकाचा अभिप्राय

(सुनीत)

केलें नूतन काव्य, ज्यांत न दुजें प्रेमोद्भवावांचुनी
प्रेमें सुंदर काव्य मी लिहुनिया स्नेह्यास तें दाविलें,
बोले पाहुनि काव्य, 'अक्षर असें मी ना कधीं पाहिलें,
या काव्यांतिल बा! खरोखरि असें उत्कृष्ट तें अक्षर'
आलें फार हंसू मला परिसुनी त्याचा अभिप्राय हा
वाटे तैं अनभिज्ञ यापरि किती आहेत तें ना कळे
चालावें बहिर्‍यापुढें मधुरसें संगीत जैसें महा
कीं अंधाप्रति दाविणें अपुलिया कौशल्य चित्रांतलें
संन्याशाप्रति सांगणें विनवुनी 'घ्या हा गृहस्थाश्रम'
वा संसारिक मानवास वदणें 'संन्यासवृत्ती बरी'
'हें सारेंच अशक्य' पातलि जधीं ही कल्पना अंतरीं
मी तेव्हां व्रतमौन घेउनि बसे पाषाणमूर्तीसम

० ० ०

तेव्हांपासुनि गूढ हें निशिदिनीं घोळे स्वचित्तामधीं
सत्काव्यांतिल मर्म या अरसिकां सांगा कळावें कधीं?

काव्यरत्नावली मे १९३१

# क्षणभरी रहा तूं उभी अशी

(जातिः–प्रणयप्रभा)

क्षणभरी रहा तूं उभी अशी
मज लिहुं दे कविता सुंदरशी ॥धृ॥

अवलोकुनि तव हें वदनांबुज
तीळ गालिंचा भ्रमर गमे मज
करी नथीशीं गोष्टी गुजगुज
जणुं प्रणयकथा तो कथी तिशी ॥१॥

प्रसन्न तव मंदास्मित वदन
प्रसवाया मज लावी कवन
करितां मी तव मुखावलोकन
मज गमे पौर्णिमेचाच शशी ॥२॥

अर्धसैल तव आंबाड्यावरि
शोभा दे बट–मोगरा खरी
शुक्र चांदणी नील ढगावरि
चमकते नभोमंडलीं जशी ॥३॥

अहा तुझी तनुलता सु–कोमल
मूर्तिमंत सत्काव्यच केवळ
कविहृदयाला सदैव रिझविल
वसुधेस जेवि दे मोद शशी ॥४॥

स्त्री मे १९३२

# हुरहूर

(सुनीत)

ज्यावेळीं घडलें सुहास्य वदने ! तूझें मला दर्शन
शुक्राची मधु चांदणीच गमले आलीस तूं भूवर

दीप्तीनें अपुल्या तुवां सजविलें माझे मनोमंदिर
तूझी मोहकता मदीय हृदया कां घेइ आकर्षुन

वर्षर्तूमधिं स्वैर नर्तन करी सौदामिनी अंबरीं
विश्वाला क्षणमात्र देउनि द्युति अदृश्य ती पावतें

तद्वत् मोहक लास्य दाउनि मला तूं आपुले सुंदरी !
मज्जींवा हुरहूर लावुनि सये ! गेलीस आतां कुठें ?

चक्षूंनीं रमणीय देहलतिका जेंव्हां तुझी देखिली
माझा मानस-वृक्ष प्रीति-कुसुमें भारावला तेधवां

आतां जो मधुर स्मृतींत मजला आनंद वाटे नवा
तो प्रत्यक्ष न दर्शनांत तुझिया, तूंतें जरी पाहिली

० ० ०

चित्ताला हुरहूर ही मधुरशी वाटे प्रभो ! जोंवरी
देशी पूर्णविराम कां न सखया ! जीवास या तोंवरी ?

वागीश्वरी मे १९३२

# कवि आणि कैवर्तक

(सुनीत)

चंडांशू जलधींत घेउन उडी गेहाप्रती चालला
लेवोनी जणुं शोणवस्त्र नटली ही पश्चिमादिग्वधू
प्राचीला रजनीहि घेइ बुरखा शीर्षावरोनी निळा
ती प्राणेश्वर-दर्शनोत्सुक म्हणे पाहीन केव्हां विधू ?
मी सायंतनि पातलों हळुहळू रत्नाकराचें तटीं
तों कैवर्तक कार्यमग्न कुणिसा मी देखिला त्या स्थळीं
होता तो गळ टाकुनी स्थिर उभा त्या सागराचें जळीं
झाले निष्फळ सर्व यत्न म्हणुनी तो जाहला हिंपुटी
ऐशी पाहुनिया सुसंधि, पुसलें मी त्यास, बा धीवरा !
कां अब्ध्यूदकवासि–मीन वधुनी पापार्णवीं पोहसी ?
त्वत्कंठीं यमही असाच अपुला घालील रे वागुरा
याचा काय विवेक नाहिं अपुल्या केलास तूं मानसी ?

० ० ०

तत्वज्ञान मदीय हें उमगलें त्या सुज्ञ कैवर्तका
बोले सद्गत होत, 'जीव जगतीं सर्वांप्रती सारखा'

सुधाकर मे १९३२

# दंवबिंदु

( चाल :- चंद्रकांत राजाची )

रजनीराणी स्मितवदनानें माहेरीं जात
    म्हणुनि चंद्रमा करूं लागले नभीं अश्रुपात
अश्रूंचे जे बिंदु ठिबकले शशिनेत्रांमधुनी
    तेच काय हे दंवरूपानें दिसति तृणावरुनी
किंवा गगनांतील तारका या लुकलुकणाऱ्या
    दंवरूपानें तृणांतृणांतुनि संचरल्या साऱ्या
वा रजनीच्या रत्नमालिकेंतील दिव्य मोती
    ओघळले हे खालीं कांहीं तरूलतांवरती
अथवा गगनांतिल रत्नांचें फुटुनी भांडार
    तृणशय्येवरि काय पहुडलीं रत्नें हीं स्वैर ?
वसुंधरेच्या निळ्या छताला डिकलेले मोती
    शशिकिरणांनीं काय आणिले तृणांकुरावरती ?
असेल झाला विवाह रात्रीं नभोमंदिरांत
    दंवरूपे त्या काय अक्षता तृणावरी दिसत ?
किंवा रजनी खेळत असतां स्वैर अंतराळीं
    नकळत पडल्या वेणींतिल या पुष्पकळ्या खालीं
तृणांतील अति सूक्ष्म कीटकां मुख बघण्या अपुलें
    चिमुकलेच हे दर्पण ईशे काय निर्मियेले ?

वऱ्हाड शाळा पत्रक जानेवारी १९३२

# वृक्ष आणि लता

( जाति :- माधव करणी )

ग्रीष्मर्तूच्या प्रखर उन्हामधिं एक जरठ वृक्ष
ज्याला पानें नच वा फुलें
लटके यौवन मिळवायास्तव सदैव तो दक्ष
ज्याची भुईंत किडकी मुळें

दिसे भव्यसा परी तयाची जीर्ण देहयष्टी
नेम नच कधीं तो पडेल
चढली होती त्यावर,-चित्तीं सदैव जी कष्टी
अशी सुकुमार एक वेल

परस्परांतिल विसंगतेची होतां जाणीव
लता ती खेद बहू मानी
सौख्यहीन कंठितां आयु, तिज गमे नको जीव
प्रभो ! ती म्हणे मरण आणी

दिवस यापरी जातां कांहीं, एक दिनी तरु तो
पडे भूवरि झंझावातें
लता करी आक्रोश, परी तिज कोण अतां पुसतो-
आपुले आठवुनी नातें ?

अनाथ हो वल्लरी, न आतां तिला कुणी वाली
बालविधवाच अभागी ती
प्रेमदृष्टिनें परी लता ती पाही भंवताली
परी हो निराशाच अंती

० ० ०

मत्कवितेचा गूढार्थ जरा रसिका ! तूं जाण
नको तूं पडूं संभ्रमांत
पहा शोधुनी बुद्धिरज्जुला देऊनिया ताण,
चालते काय समाजात

१५-२-३२



# देवी श्री अहिल्याबाई

(आर्या)

**दे**वा-चरणीं अपुलें तन, मन, धन, अर्पुनी सु-भावानें
तूं राज्यव्यवस्थेचें कार्य मुदें वाहिलेस नेटानें ॥१॥

'**वी**रांस पारितोषक, कारागीरांस आणि मल्लांस
देवूनि भूषवावें' गुण तुझ्या अंगि हा करी वास ॥२॥

**श्री**मंत, गरिब, अथवा 'हा आहे उच्च आणि हा नीच'
हा भेदभाव अपुल्या देशीं तूं दाविलास न कधींच ॥३॥

**अ**पुल्या प्रिय प्रजेस्तव घेसी तूं श्रम सदा अविश्रांत
कां व्हावा न सुखी मग, देवी तव दिव्य माळवाप्रांत ? ॥४॥

**हि**रवीं शेतें लावुनि, पक्षांना चारिलास तूं चारा
धन्य तुझी कीं कधिही षड्रिपुंना तूं दिलास ना थारा ॥५॥

'**ल्या**वें वस्त्र अमोलिक देहावरि' धरिलि ही न तूं आस
निर्लोभि वृत्ति ही तव, स्मृतिदायक आज वाटते खास ॥६॥

**बा**ई देवि अहिल्ये, तीर्थ-क्षेत्रीं परोपकारार्थ
तूं घाट, धर्मशाळा, बांधियल्या त्यजुनि लोभमय स्वार्थ ॥७॥

**ई**शकृपें जर तुजसम, दुर्मिळ स्त्री-रत्न आज जन्मेल
तर नीति, सद्गुणांचे, अमुच्या भगिनींस पाठ मिळतील ॥८॥

'वऱ्हाड शाळापत्रक' सप्टेंबर १९२९

# बा परमेश्वरा !

(अभंग)

जळीं, स्थळीं, काष्टीं, तैसाच पाषाणीं
वास चक्रपाणी ! तुझा असे
अनाथांचा वाली, दीनांचा कैवारी
तूंच ना श्रीहरी ! जगामाजी
भक्ताचीयासाठीं तुवा हरघडी
गंगेच्या कावडी वाहिल्या ना ?
अवकृपा मग मजवरी कां ही ?
दया येत नाहीं काय तुला ? ॥१॥

लिहिलीं मी देवा ! बहू प्रेमगीतें
विस्मरूनी तूंते आजवरी
कधींही न केले तुझे मी चिंतन
कोठुनी पूजन मग तुझे ?
पश्चात्तापाग्नीनें दग्ध झालें मन
देवा ! आतां लीन तुझे पायी
नको अंत पाहूं आतां जगजेठी !
धांव भक्तासाठीं लवलाही ॥२॥

विधात्यानें केली सृष्टी ही निर्माण
सुखास ना वाण तींत कांहीं
सुखामागे आम्ही लागतो मानव
मग कैसा देव आठवावा ?
दयाळा ! तूं घेसी परिक्षा ही मोठी
भक्ताची कसोटी पहावया
परी देवा ! मी हें अजाण लेंकरू
नको अढी धरूं मनामध्यें ॥३॥

बुडत्याचा पाय अधिक खोलांत
तैशी आहे गत माझी देवा !
हेलकावे घेतां जीविताचे तारू
हांका कुणा मारूं तुजवीण ?
तूंच तार मला, तूंच मार मला
जीव हा वाहिला तुझे पायीं
अनुकंपा करी आतां नारायणा !
येई न करुणा कशी माझी ? ॥४॥

आत्मज्ञानाचा कां वाहूं वृथा गर्व ?
जाणसी तूं सर्व पांडुरंगा !
मुखें जी वदतो कविता--वैखरी
कृपा खरोखरी तुझीच ती

आटापिटी केली जीवाची मी फार
वैभव--शिखर गांठावया
परी आतां माझे तयार हें मन
घ्यावया लोळण तुझे पायी ॥५॥

अपराध माझे होती निरंतर
क्षमा त्याची कर दयाघना !
चुकलेला आहे देवा ! हा प्रवासी
योग्य मार्ग त्यासी दाखवी तूं
घडावी हातून सतत सत्कृति
बुझावी न स्मृति तुझी कदा
माझ्या मुखीं येवो तुझे गुणगान
हेंच वरदान देई देवा ॥६॥



# विप्र आणि अस्पृश्यकन्या

(दिंडी)

श्रांत सविता अस्तास जात होता
पवन अपुलें मधु गीत गात होता
पांखरांचा समुदाय अंतराळीं
दिसत होता प्रमुदीत, अशा वेळीं ॥१॥

विप्रदुहिता पातल्या अंगणांत
आणिं तन्मय जाहल्या विहारांत
दलितवर्गाची तोंच कुणी पोर
येइ त्यांच्या गृह–फाटकासमोर ॥२॥

म्लान होता मुखचंद्र त्या मुलीचा
आणि बांधा कृश तसा शरीराचा
मलिन वसनांनी तनू झांकलेली
विप्रसदनी कां पोर अशी आली ? ॥३॥

विमल कलिकांसम मुग्ध बालिका त्या
करुण मूर्ती ही न्यहाळीत होत्या
एक त्यांतिल परि पुसे, घेत धांव
कोण ? कुठली तूं ? काय तुझे नांव ? ॥४॥

तहानेनें व्याकूळ जीव झाला
'जरा पाणी द्या मला प्यावयाला'
वदुनि ऐसे अस्पृश्य बालिका ती
भाव मनिंचा दर्शवी स्वाश्रुपातीं ॥५॥

विप्र बोले गृह–गवाक्षामधून
त्वरित होई तूं चालती इथून
महारांना पाजावयास पाणी
काय नोकर ठेविले इथे कोणी ? ॥६॥

बालिका ती लावून हात भाळा
म्हणे, देवा ! हा न्याय काय झाला ?
अंध अमुचा हा सर्वदा समाज
कोण अमुची राखील प्रभो ! लाज ? ॥७॥

'सुयश' दिवाळी अंक १९७२



# हाय ! हाय ! आई गेली

( गज्जल )

तुझ्या या दीन बाळांची — तुला करुणा न कां आली ?
अम्हांला सोडुनी आई — कुठें तूं चालती झाली ? ॥धृ०॥

तुझी नामस्मृती होतां — अम्हांला लागतो ध्यास
तुझ्यावीना सुअन्नाचा — गिळावा गे कसा घांस ?
जगीं या एक मायेची — अशी होतीस तूं माता
परी घ्याया कधीं सल्ला — कुठें जावें अम्ही आतां ? ॥१॥

तुझी ती शाल मायेची — अम्हांवरि कोण घालील ?
प्रसंगी धीर देण्याला — अम्हांला कोण येईल ?
अवस्था आमुची झाली — जणूं दर्यांतले तारू
कुणाला यापुढें 'आई' — अशी हांका आम्ही मरूं ? ॥२॥

यमाच्या क्रूर दूतांनी — कुण्या ठायीं तुला नेली ?
मुळापासूनि उपटाव्या — फुलांच्या कां अशा वेली ?
अरे निष्ठूर तूं काळा — कसा केलास हा कोप ?
असा कां पायि तुडवावा — बिजाचा कोंवळा रोप ? ॥३॥

दयाळू पृथ्विच्या राजा – बरे वाईट होणारे
शुभाशुभ दिवस दाखविणें – तुझ्या हातींच ना सारे ?
दिनांचा तूंच ना वाली – प्रसंगी संकटीं कालीं
कशी मग आमुची आई – अम्हांला पारखी झाली ? ॥४॥

तुझ्या या दीन बाळांची – तुला करुणा न कां आली
अम्हांला सोडुनी आई – कुठें तूं चालती झाली ?

महाराष्ट्र शारदा भाग २ रा

★

# निद्रिस्त कवीस

(चाल :– आनंदी आनंद गडे)

ऊठ कवे ! तूं ऊठ कवे – निद्रा इतुकी बरी नव्हे
देशाला लागे आग – कशी न ये तुजला जाग ?
बांधव तव मारिति हांका – जाणिव याची नाहिच का ?
बघ हा द्युमणि – येई गगनीं – तरि तूं अजुनी
घोरत पडसी या ठाया – ऊठ ऊठ तूं कविराया ! ॥१॥

शुक बोले तुज 'ऊठ झणी' – गा कर्तव्याची गाणीं
मैना ही वदते तूंते – गा स्फूर्तीची तूं गीतें

रवि—किरणें तव मुखावरी -- उत्साहे करिती स्वारी
सुचर्वित तुज कीं – निद्रा टाकी – करुणा भाकी—
ईशाची, जा शरण तया – ऊठ ऊठ तूं कविराया ! ॥२॥

क्रांतीच्या साम्राज्यांत – कां असशी तूं अज्ञात
स्फूर्तिप्रद तव कवनांची – उणीव भासतसे साची
नको प्रीतिची तीं कवनें – दुनिया ज्यानी प्रेमि बने
स्फूर्ति देवता – हृदयीं वसतां – कां भीसि वृथा ?
चैतन्या जगता द्याया – ऊठ ऊठ तूं कविराया ! ॥३॥

पहा शारदा सुकुमारा – तिमिर लया गेला सारा
मंदस्मित करि वसुंधरा – ऊठ कवे ! तूं पहा जरा
जागृत झाले जग सारे – निद्रावश कां तूंच बरे ?
चल ऊठ झणी – शय्येवरुनी – आळस त्यजुनी
विनवाया का अधिक हवे ? – 'ऊठ कवे तूं ऊठ कवे' ॥४॥



# तिमिरांत खरा यश-मार्ग असे

( जाति :– प्रणय प्रभा )

तिमिरांत खरा यश-मार्ग असे
हें अवगत तुजला नाहिं कसें ? ॥धृ०॥

सुलभ मार्गि करि 'अपयश' वसति
म्हणुनी जगती मानव फसती
दैवाला बहु दोषहि देती

परि मनुजाला हें कळत नसे
'तिमिरांत खरा यश–मार्ग असे' ॥१॥

दुस्तर मार्गी यशोदेवता
उभी साहसी तरुणांकरितां
नूतन पथ बहुधा आचरितां

यश दिव्य त्यांत मनुजा गवसे
तिमिरांत खरा यश–मार्ग असे ॥२॥

योजुन अवसेचीच यामिनी
तानाजी गड जाई चढुनी
धवल तया का नव्हती रजनी

कां गनिमी कावा लढवितसे ?
तिमिरांत खरा यश–मार्ग असे ॥३॥

संकटांस जो देइल टक्कर
वीर तरुण ऐसा अवनीवर
गांठिल दिव्य यशाचे मंदिर
'अपयश' त्याच्या स्वप्नींहि नसे
तिमिरांत खरा यश–मार्ग असे ॥४॥

'प्राविण्य' जानेवारी १९३४

# सौख्यमग्न फूल

(दिंडी)

रूप–यौवन-संपन्न गौर बाला
मंदगतिने नित जाइ उपवनाला
धवलवसनांकित आज बालिका ही
युवक–हृदयें काबीज करित जाई ॥१॥

तिनें अपुल्या मृदु केशकलापात
शुभ्र होते खोविलें फूल एक

तलमवस्त्राच्छादीत केशभार
फूल त्यांतुनि परि दिसे रम्य फार ॥२॥

गौर ललना-छे, काव्य मूर्तिमंत
बघुन येई कल्पना मन्मनांत
फूल वेणींतिल तिचे भाग्यवान
शिरीं बसण्याचा मिळे त्यास मान ॥३॥

मृदुल केशांचा बिछाना फुलाला
'वस्त्र' मच्छरदाणीच जणूं त्याला
शांत चित्तें पहुडले फूल आंत
सुखस्वप्नें जणुं गोड अनुभवीत ॥४॥

'सूर्यअस्ती होणार असे अंत'
कसे यावें हे फुलाच्या मनांत ?
क्षणिक सौख्यीं दंग वृत्ती फुलाची
काय बोलूं ? असतेहि मानवाची ॥५॥

७-११-१९३१

# रविवारीं भोजनोत्तर

(दिंडी)

वामकुक्षीचा समय तो असून
काव्यवाचनिं मच्चित्त होइ मग्न
मृदुल शय्येवर पडुन मी मजेनें
पुस्तकांतिल वाचिली दहा पानें

जांभया तों लागल्या मला येवूं
तनू माझी लागली शिथिल होऊं
काव्यवाचन चालून मंद तेव्हां
नाहिं कळलें लागली झोंप केव्हां

काव्यपुस्तक हातांतुनी गळून
कधीं पडले वक्षावरी, न भान
तास गेले होऊन कधीं चार–
दाद नाहीं, झोपेंत तरी चूर

पातले तों खोलींत कुणी स्नेही
मला उठवाया यत्न करिति कांहीं
म्हणति 'कविला निद्रा न योग्य ऐशी
खेळणारा कवि सदा निसर्गाशी'

तोंच हास्यध्वनि स्नेहिमंडळींचा
श्रवणि पडला, हो भंग शांततेचा
पूर्ण जागृत तेधवां मी असून
स्नेहि हंसती कां ? गूढ हे कळे न

'कवे ! वक्षावरि काय तुझ्या आज ?
सांग, कैशी तूं सोडिलीस लाज ?'
शब्द कटु हे ऐकतां मी तयांचे
चित्त माझे सक्रोध होय साचे

ग्रंथ काव्याचा तयां मारण्यास
वक्षस्थळिचा लागलो घ्यावयास
परी नसुनी तो ग्रंथ तेथ साचा
पडे फोटो दृष्टीस मत्प्रियेचा

तदा लज्जित मी होउनिया काहीं
'तिला' पुसलें कुणि केलि मस्करी हीं ?
हास्य करुनी ती वदलि मला तेथ
कोण थट्टा करणार दुजे ? नाथ

'विविधवृत्त' ४ जुलै १९३२

# विरहिणी

आपला पति संसारत्याग करुन एकाद्या साधूबरोबर यतिवेषरुपाने तर गेला नसेल ना ? या शंकेने एक आर्य स्त्री आपल्या अज्ञात पतीस उद्देशून म्हणते—

होत न कां मत्स्मृति–बघावा अंत मोहना किती ? ॥धृ०॥
विरहाग्नीने तनू ही जळे
नयनींचेही पाणी न खळे
जलावीण मासळी तळमळे

ऐशी माझी स्थिति–बघावा अंत मोहना किती ?
कंटकमय मृदुशय्या गमते
विश्व तुम्हांविण शून्य भासते
जीवित बाई नको वाटते

होतां अपुली स्मृति–बघावा अंत मोहना किती ?
संसाराची अपुली नौका
अर्ध पथीं टाकुनि जातां कां
उपरति इतुक्यांतचि झाली कां ?

बरी नव्हे ही कृति–बघावा अंत मोहना किती ?
संसाराचा चुकेल त्रास

म्हणुनी गेला असाल खास
करावया गिरिवरी निवास

होउनि आपण यति-बघावा अंत मोहना किती ?
स्वार्थी, कपटी दुनिया सारी
मानव-भुजंग त्यांत विषारी
मी तर बाई अबला नारी-

तशांतुनी फुलवती-बघावा अंत मोहना किती ?
निष्ठुर अपुले कां झालें मन ?
करुण दशा ही माझी पाहुन-
याल केधवां आपण धांवुन

द्याया मजला धृति-बघावा अंत मोहना किती ?
रात्रंदिन तव मूर्ति मनोहर-
स्मरतां, लागे मनास हुरहुर
प्रतिमा अपुली पाहुनि सुंदर

भ्रमून जाते मति-बघावा अंत मोहना किती ?
सागरा न सरिता विस्मरते
वल्लरी न विसरे वृक्षाते
जीवितेश्वरा, कैशी मातें

होइल तव विस्मृति–बघावा अंत मोहना किती ?
त्वद्दर्शनलोलुप ही मैना
झुरे मनीं, द्या त्वरें दर्शना
प्रेमें मग मीं माझ्या रमणा–
ओवाळिन आरती–बघावा अंत मोहना किती ?



## ‘तेव्हां आणि आतां’

होतों आपण जेधवां उभयतां बाल्यप्रदेशामधें
हर्षे बागडलों सये ! कितितरी तूं आणि मी तेधवां !
‘तूं ताई मम, बंधु मी तव’ असें नातें तदा जोडुनी
विद्या आपण कांहिं काल शिकलों जाऊन शाळेमधें
‘ए, बी, सी, डि’ न जाहली गिरवुनी गे चांगलीशी मम
बाबांनीं मज शिक्षणास्तव पर–प्रांतांत तों ठेविलें

वर्षे गेलि अनेक, दर्शन पुन्हां नाहीं तुझें जाहलें
मीही मद्व्यवसायिं नित्य रमुनी आयुष्य हें कंठितों
योगायोग अहा विलक्षण किती मार्गांत तूं भेटसी
लज्जा, नम्रपणा तुझ्यांत दिसुनी कां आज गे येतसे ?
कंठीं मंगलसूत्र, कुंकुम-चिरी भाळीं तुझ्या ही दिसे
अन् खांद्यावरि सान बालक दिसे गोजीरवाणे मसी

० ० ०

कां पूर्वस्मृतिनें मुखेंदु तव हा हो म्लानसा राजसे ?
आतां झालिस प्रौढ, मातृपदही तूंतें मिळालें असें

' वऱ्हाडशाळा पत्रक ' मार्च १९३१



# 'होय' म्हणतांना

सुनीत

(कविवर्य केशवकुमार यांची क्षमा मागून)

देतां उत्तर 'होय' सुंदरि तुला संकोच कां वाटतो?
कां ही नाजुक देहवल्लरि तुझी कांपावया लागली?
तूझी बालिशता पळून वद कां गंभीरता पातली?
होकारार्थि हुकार काय दडुनी ओष्टद्वयी राहतो?
कां ही आजच मौनवृत्ति सखये! स्वीकारिली तूं बरे?
त्वच्चित्तांतिल भाव काय उमगूं? कां हा अबोला वृथा?
दृष्टी कां खिळली भुईवर तुझी? लज्जा अतां ही पुरे
प्रश्नाचे मम 'होय' उत्तर मुखें दे आपुल्या तूं स्वतः
नाना प्रश्न विचारुनी मज सदा होतेस भंडाविलें
माझा एकच प्रश्न हा परिसुनी कां मुग्ध झालीस तूं?
त्वन्नेत्रांमधिं अश्रुबिंदु चमकूं कां प्रेमले लागले
आनंदाश्रुच काय हें ठिबकती भावी सुखाचे तुझ्या?

० ० ०

कां बाहूंवरि माझिया कर तुझा हा ठेविसी कंपित
चित्तांतील तुझ्या अतां सुरुचिरे! मी जाणिलें हृद्गत

'भालचंद्र' दिवाळी अंक १९४१

# 'आराम हराम है'

[अभंग]

सदैव आरामांत मश्गूल रहाणाऱ्या निष्क्रीय महाभागास कै. नेहरूंच्या 'आराम हराम है' या संदेशाची अजून तरी किंमत कळेल काय ?

आरामाने होतो सर्व सत्यानाश
नेहरू आदेश देते झाले
जीवनात नको आमुच्या विश्राम
'आराम हराम आहे' जाणा
भारताचे आम्ही आहो नागरीक
भावना ही एक असो द्यावी
परचक्राचे ते टांगते हत्यार
आहे डोईवर जाणा मनी १
झोपाळू माणसा, पुरे हा आराम
सदैव विश्राम बरा नव्हे
प्रतिष्ठा देशाची सदा आम्ही राखू
शत्रुलाही रोखू त्याच जागी
'निष्क्रीयता त्यागूं' हाच धरी बाणा
संदेश लोकांना नेहरूंचा

आपुला हा हात असे जगन्नाथ

आरामाची बात नसो द्यावी २

श्रमजीवी नरा सांगा काय उणें ?

आरामाचे जिणें बरें नव्हे

मानवाने सदा जगावे कष्टानें

काय आरामानें साध्य होय ?

भारताची शान जरा वाढवाया

झिजवी तूं काया थोडी तरी

नेहरूंची स्मृति जर ठेवायाची

कांस आरामाची धरूं नको ३



# मीलन

मद्वक्षावरि ठेव फुलासम क्षणभरि तव मस्तक
मिटल्या नयनीं प्रणयाचें तूं अनुभव कांहीं सुख
जरा उष्ण श्वासाचें अपुल्या होऊं दे मीलन
स्वर्ग-सुखाचें करूं निरीक्षण चल मिटुनी लोचन

मत्बाहूंच्या वलयीं करुं दे बद्ध तुझी तनुलता
तूंहि यत्न करि मुक्त व्हावया, यांत खरी चारुता
अन्योन्यांचे अधरद्वय अति आतुर आलींगना
विलंब न असा बरा, न तुजला प्रेमाची कल्पना

काय बोलसी ? लटकी प्रीती करितो मी तुजवर ?
हृदयच माझे त्वत्प्रश्नाचें देइल या उत्तर
प्रेम न तव मजवरी, तरी कां सांग गवाक्षांतुन
मार्गप्रातिक्षा करीत माझी बससी रात्रंदिन ?

अन देशांतर करितां मी, कां दाटुन ये तव गळा ?
त्वन्नेत्रांतुन वाहुं लागती कां अश्रू घळघळा ?

प्रीत न माझी खरी, तरी मग कां तूझी संतत–
बकुलफुलांची माळ चिमुकली मी बसतो हुंगित ?

व्यक्त कराया प्रणयभाव कां लाज वाटतें तुला ?
तुझे मनोगत नुमगायाला काय असे मी खुळा ?
असेल माझी लटकी प्रीती, खरी तुझी ना पण ?
कां मग इतुका अंत पाहसी ? दे झणि आलींगन,

१२–२–३२

# मार्गप्रतिक्षा

[ चालः – मुदित मनचकोर ]

( वनवासांत्त दोन प्रणयीजीवांची चुकामूक झाली. आपल्या प्राणेश्वराचा विरह असह्य होऊन, घोर अरण्यांत एका अभागिनीनें आपल्या–हृदयेश्वराची प्रतिक्षा करीत गायिलेलें गीत )

कुठवर मी वाट तुझी पाहुं राजसा !
आजच कां अंत गडे पाहसी असा ? ॥ धृ ॥

नयनयुगुल हे मदीय श्रांत जाहले.
वदन, नाममंत्र तुझा गात राहिले
हांका तुज मारुनि हो कोरडा घसा १

हें सभोंवती अरण्य दाट, ज्यामधें-
विहरतात स्वैरपणें क्रूर श्वापदें
भीति दावि दृष्य हें मदीय मानसा २

पुष्पांची धवल शेज होय भूवरी
ढाळितात अश्रुबिंदु वृक्ष-वल्लरीं
मजवरती प्रेमभाव दाविती कसा ? ३

वदनचंद्र रुचिर तुझा बघुनि सुंदरा !
येइल कधिं भरती मम हृदय-सागरा ?
तव दर्शन-लोलुप हा जीव हो पिसा ४

धैर्यमेरु ढांसळला हृदय-राजिवा !
भेट मला देशिल तूं सांग केधवां ?
जाहला मदीय वदन-चंद्र म्लानसा ५

'मनोरंजन' मार्च १९३३



# चल चढावया संसार–गिरी

[ जाति :– प्रणयप्रभा ]

चल चढावया संसार–गिरी
साशंक अशी कां हृदंतरीं ?
सुखदुःखांचा पथ हा खडतर
श्रांत यांत जर झालिस तूं तर
धरुनी हक्कानें माझा कर
चढ हळू–हळू तूं वरी वरी
साशंक अशी कां हृदंतरीं ? ॥१॥
आश्रय घेउनि अन्योन्यांचा
दुःखांच्या ओलांडु खांचा
लाभ असे यांतच दोघांचा
चारुता यांमधें खरोखरी
साशंक अशी कां हृदंतरीं ?
अवलोकुनि निज गिर्यारोहण
देवहि जातिल मनि आनंदुन
करतिल सुमवृष्टी स्वर्गांतुन
मग धन्य होंउ या अवनिवरी
साशंक अशी कां हृदंतरीं

'स्त्री' जुलै १९३४

# अबोला

छंद :—ओवी

कितीबाई मनामध्ये — धरायची आतां तेढ ?
कधिं जाईल हे वेड ?

असा काय अपराध — माझ्या हातूनिया झाला ?
सोडा गडे हा अबोला

माहेरीं राहिल्यें फार — म्हणून का आज बाई
स्वीकारिली मुग्धता ही ?

प्रणयाची मुग्ध कळी — प्रफुल्लीत करा गडे
जीव माझा धडधडे

लता चढे वृक्षावरी — प्रणयांधळा तरू तो
कसा सानंदे डोलतो ?

येतां सरिता भेटाया — तेव्हां काय रत्नाकर—
धरी मौन ? द्या उत्तर

आलींगिते सौदामिनी — तेव्हां मेघराज खालीं
कसा आनंदाश्रु ढाळी ?

सोडा आतां मौनवृत्ती — ओठांच्या त्या लाल कळ्या
होऊ द्या गडे मोकळ्या

मधुस्मिताचे तुषार – सोडा वातावरणांत
होऊ द्या हें चित्त शांत

अबोला हा पुरे आतां -- दोन शब्द बोला गोड
पुरवा मनींचे कोड

'स्त्री' जुलै १९३३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७८५७३ वि: काव्य
क्रमांक 2792 नों: दि:



म. ग्रं. संग्रहालय
प्र. क्र. 7८५७

## विमानास

[ दिंडी ]

जशी व्योमीं स्वच्छंद फिरे घार
तेवि अंबरि तूं फिरसि सभोंवार

दिसे 'खगवर' उपमाच तुला सार्थ
आयु जगतीं तव परोपकारार्थ १

तुझी देहाकृति पाहतां त्रिकोणी
'वातनौका' वदतात तुला कोणी
अम्हांला तूं गंभीर ध्वनीद्वारा
'येत आहे मी' देसि हा इशारा २

इशारा तूं देतां स्व-गर्जनेनें
सान बाळें तुज बघति कौतुकानें
मुदें थोरहि बालकांच्या समान
वदति अन्योन्या 'पातले विमान' ३

गिरी, सागर, भूवरुनि स्व-स्थलास
जासि वेगें घेवूनि मानवास
मार्ग क्रमिण्या ना लाविसी विलंबा
हाच आम्हां तव वाटतो अचंबा ४

जरी आला कधिं तुला पथीं धोका
तधीं कोणाला मारशील हांका ?
अनेकांना लाभली जल-समाधी
म्हणुनि देतो सूचना तुला आधीं ५

जीव घालुनि धोक्यांत काल कांहीं
'वेग देणे फाजील' योग्य नाहीं

अल्प कालांतिल दौड तुझी धन्य
जगीं नाहीं तुजपरी कुणी अन्य ६

तुझ्यासंगे करणें सदा प्रवास
शक्य आहे श्रीमंत मानवांस

तुझी धनिकांस्तव असे दिव्य काया
काय गरिबांस्तव योजिसी उपाया ? ७

'चित्रमयजगत्' जून १९३०

★

# कवि

(चाल :- चंद्रकांत)

कविचे आहे नाते न कळे काय निसर्गाशीं
निसर्गमय–कविहृदय निरंतर खेळें कवनांशीं

सूर्य, चंद्र, गिरि, निर्झर तारे कविदृष्टींतून–
आजवरी नच सुटले, कविची दृष्टि खरी तीक्ष्ण

नवनीतापरि हृदय कवीचें मृदुल अती साच
सबाष्पलोचन कविचें हो कटु दृश्य पाहतांच

प्रौढ मानवां कवि दावितसे वृत्ती गंभीर
आणि बालसृष्टींत होतसे कवि अल्लड पोर

पुष्पांकित–मृदु–लता वायुनें हलतां हळुवार
कवि–प्रतिभा काव्यांगणिं करिते मधुनर्तन स्वैर

मृत राष्ट्राला संजीवनि दे कवि कवनद्वारा
विश्वाची रात्रंदिन चिंता कवी वाहणारा

सौंदर्याचा, ललितकलेचा, निसर्गदृश्याचा
'कवि' हा आत्मा सारस्वत–मंदिरामधें साचा

कवीवैखरी देइ चेतना निराश हृदयाला
काव्यांबुज–रस प्राशुनि ये रसिकत्व अरसिकाला

'वऱ्हाड शाळा पत्रक' जुलै १९३२



# वेणुनाद

(चाल :–रामाच्या ग बागेमधें)

(श्रीकृष्णदर्शनोत्सुक राधिका आपल्या मैत्रिणीस विचारते)

जादु का असे? समजुदे तसे
हरीच्या ग वेणुमधें जादु का असे? ॥ध्रृ॥

धेनु, वांसरें धांवती त्वरे
प्राणिमात्र मूक जीव जाहले पिसे १

तरुलतादिका, सांग स्तब्ध कां?
काय वनश्रीहि मंत्रमुग्ध होतसे? २

वेणु–माधुरी, काय वदुं तरी
ब्रम्हांडाचीहि जींत मोहनी वसे ३

सासुबाइ या वदति, 'कासया-
दृष्टि तुझी आज मुली बावरी दिसे'? ४

'घेउनी घडे, ये नदीकडे'
वेणुनाद सुचवि मला वाटतें असे ५

कार्य थांबते, भान हरपते
सांग सखे आज असें काय होतसे? ६

मंजुतान तीं, भ्रमवि मन्मति
कुंजवनी धांव घेइ चित्त स्वैरसे ७

दुमदुमे वनीं, वेणुचा ध्वनी
कळत नाहिं कोणिकडुन मात्र येतसे ८

मी खुळ्यापरी शोधितें तरी–
कृष्णमूर्ति सांवळी न लोचना दिसे ९

० ० ७

तोंच मागुनी, कृष्ण येउनी
हृदयि धरी तीस,–गालि राधिका हंसे ॥१०॥

'मनोरंजन' आक्टोबर १९३४

# आगगाडीस—

(दिंडी)

मार्ग क्रमिण्या घेतां न दीर्घ काल
नेसि अमुचें परगांवि तूं टपाल
वाहसी तूं शेंकडो लोक नित्य
'लोकसेवा' तव ध्येय गमे सत्य

विकत घेउनि त्या 'मार्गदर्शिकेस'
तुझ्यासंगे जन येति राजरोस
आज दिल्ली तर उद्या बंगलोर
पाहण्याला जातात सान थोर

पूर्विचा तो पूर्वजांचा प्रवास
कल्पनेचा त्या नको मुळी वास
दऱ्या, खोरीं, अन् खोल नद्या, नाले
आज दैवें आमुच्या नष्ट झाले

खावयाला तुज कोळसा भुकेला
तेल तैसें प्यावयाला तृषेला
देसि ढेंकर तूं सदा शिटीद्वारें
तुझे चाळे हे सर्व कांहिं न्यारे

उंच ताडापरि तुझे बंधु सारे
उभे केले त्वां जागजागीं सारे
क्रमानें ते घालूनि खालि माना
मान देती तुज, त्यजुनि स्वाभिमाना

याच गर्वानें जासि तूं फुगून
सदा तोऱ्यानें जासि तूं निघून
असो कांहीं, परि तूं परोपकारी
म्हणुनि आम्हां झालीस फार प्यारी

तुझ्या ठायीं दुर्गूण मात्र एक
धाडिसी तूं यमगृहीं नर अनेक
चुकुनि येतां कधिं प्राणि तुझ्या आड
तोंच पडते त्यावरी तुझी धाड

अग्नियोगे तव तनू तप्त होते
दयामाया म्हणुनी न तुला येते
जरी तूं हा दुर्गूण सोडशील
तुझे जगतीं होणार नाहिं मोल

'वऱ्हाड शाळापत्रक' आगस्ट १९२९

□

# लेखणी आणि तागडी

(वृत्त :- आर्या)

(लेखणी आणि तागडी यांची कैफियत)

लेखणी :- नृपदरबारी होती मला किती मानमान्यता, जाणे
सचिवांच्या कानावरि होते मी बसत गे दिमाखाने

होती काय प्रतिष्ठा माझी ? जा तूं विचार इतिहासा
तरवारही विनम्रे होती सोडीत दीर्घ निःश्वासा

'ध' चा 'मा' जो झाला इतिहासीं, ही कथा तुला ज्ञात
कर्तृत्वाचा माझ्या गौरव शाहीर आज गातात

परि काळ आज फिरला, कर्तृत्वाला न राहिला वाव
मी आज दीन झाले, दुबळी झाले, न राहिला भाव

तागडी :- धंदा, व्यापाराला उधाण आले पहा इथे आज
चरितार्थ भागवाया, जनतेची नित्य राखते लाज

गुर्जर व्यापाऱ्यांच्या हाती मी फार कष्टते बाई
कष्टाळू मम जीवन, उसंत माझ्या जिवास ती नाहीं

बेकारीचे जीवन जगतो आहे मराठि माणूस
घेइ न आश्रय माझा, यांत कुणाचा दिसून ये दोष

शिक्षण, लज्जा, आणिक अंध प्रतिष्ठा अशा विकारांनी
कर्तव्य-शून्य झाला मराठि माणूस आण हें घ्यानीं

या गहन समस्येची उकल कराया समर्थ मी आज
परि बेकारांनी मज द्यावें सहकार्य सोडुनी लाज

धंदा व्यापारानें परिस्थितीवर करीन मी मात
चिर विश्रांती घेई पडून तूं आज कलमदानांत

महाराष्ट्राची इभ्रत आणि प्रतिष्ठाहि उंच वाढेल
उत्कर्षाचा सविता कालावधिनें इथें प्रकाशेल

'सुयश' ७ जून १९७०



# जल-तरंग

अवलोकुनि जल-तरंग
प्रमुदित हों अंतरंग
नीर स्थिर अ-सित-रंग
नयनयुगुल शांतवी ॥१॥

जल-चुंबन घेइ पवन
पवन विनय दावि लव न
करिल कोण कवि न कवन
दृश्य रुचिर पाहुनी ॥२॥

जल-लहरी या चंचल
जणुं रमणीचा अंचल
करि नर्तन उच्छृंखल
अनिल स्वैर वाहतां ॥३॥

सकल तरल जल-लहरी
नृत्य करिति जरि वरिवरि
परि तीरावरि सत्वरि
पावती विनाश त्या ॥४॥

व्यापृत मम प्रणयि हृदय
शांतवील ईश सदय
अथवा कटु काळ अदय
कारिल नामशेष तें ॥५॥

मनोरंजन फेब्रुवारी १९३३

□
□

## मी जाणित नाहीं तुला

(जाति :– बालमुकुंद)

फसविलं ग बाई चांडाळानं मला
चरचरा चिरियला माझा केसानं त्यानं गळा ॥ धृ ॥

मजवरी तयानं प्रीती केली सदा
मग मींही सहजचि त्यावर झालें फिदा
परि ध्यानीं नाहीं आलं बाई कदा–
कीं हृदयीं त्याच्या भरलें हालाहला ॥ १ ॥

मज लिहिल्या त्यानं प्रेमाच्या पत्रिका
त्या साऱ्या आतां जगास मीं दावुं का ?
फासलं तयानं काळं माझ्या मुखा
पुरुषार्थ यांत कोणता तये साधिला ? ॥ २ ॥

मकरंद फुलांतिल मधुप सेवितो जसा
गज-मुक्ताफळ भक्षितो केसरी जसा
निधि पातिव्रत्याचा ग माझा तसा-
त्या चांडाळानं बाई हाताळला ॥ ३ ॥

प्रेमाचं जाळं गुंफुन मज-भोंवती
मम शिकार केली जडावया संगती
परि होतां त्याची स्मृती, गमे संप्रती
पुनरपी वदन हें दावुं नये त्या खला ॥ ४ ॥

किति चांडाळाचं हृदय तरी निर्दय
कृत-कर्माचं लव त्याला नाहीं भय
सोडुनिया सारी लज्जा, नीति, नय
तो वदे मला 'मी जाणित नाहीं तुला' ॥ ५ ॥

१९-१-१९३२

# भाग्यवान कोण ?

अधरद्वय लाल लाल
विकसले गुलाब गाल
भाल–प्रांत हा विशाल
हृदयमंचकावरती प्रणयि–युग्म पहुडलें

कुंतल लतिका विलोल
झांकि वदन–चंद्र गोल
दृश्य रुचिर हें अमोल
तरुराजींतुन विलसे पुनवेचा चांद जसा

स्मित त्वदीय मंद मंद
प्रणयदृष्टि करित धुंद
श्वास सोडि पुष्प–गंध
चंचल तव अंचल करि उच्छृंखल मन वेडे

ही तव सौंदर्य खाण
करशिल तूं ज्यास दान
तोंच भुवनिं भाग्यवान
पाणिग्रहण करिल, रमण कवण असा अवनिवरी ?

'श्री–लोकमान्य' ३ आक्टोंबर १९३३

# मद्याधीन कविमित्रास

(सुनीत)

मित्रा ! वाचुन ती अलौकिक तुझी 'अंगार' कादंबरी
मूर्ती कायमची तुझी कविवरा ! मी रेखिली अंतरी
आतां 'अग्निपराग' काव्य बघण्या उत्कंटलें मन्मन
तूझी ती 'जळमाति' देइल कवे ! केंव्हां बरे दर्शन ?

तूं या वाङ्मयप्रांति जो मिळविला आहेस बा लौकिक
तेणे मन्मन हर्षयुक्त असणें आहेच स्वाभाविक
चिंता एक परी निरंतर मनीं माझ्या वसे प्रेमळा !
नाहीं आदरयुक्त लौकिक तुझा तूं मात्र संवर्धिला

मद्याधीन बनून तूं कविवरा ! विद्वज्जनीं मानसी-
झालासी उपहासयुक्त, न तुला बा खंत याची कशी ?
तूझा लौकिक थोर वाङ्मय-जनीं, आहे तसा प्रेरक
आहे ही मदिरा सदैव तुजला या जीवनीं मारक

० ० ०

स्पष्टोक्तीस्तव रोष होइल तुझा, आहे मला कल्पना
तूझा भाग्यरवी सदैव तळपो ही एक मद्भावना

# गोड बंदिवास

(वृत्त :– दिंडी)

सूर्य जाऊ लागला पश्चिमेस
जणूं आतुर मनिं भेटण्या प्रियेस
निसर्गांची ही बघुन प्रेमलीला
प्रणयि युग्मेही निघति फिरायाला १

सहल उद्यानीं करावया कांहीं
निघे हृदयेश्वरिसवें तदा मीही
गुलाबाचे ताटवे बघुन तेथें
हर्ष झाला आमुच्या मानसातें २

वल्लरींनी तरु पूर्ण वेढलेले–
बघुनि, विनये मत्प्रिया तदा बोले
दृढालींगन तरुलता देति, पाही
चित्तवेधक दृश्य हें किती बाई ? ३

पुढे आम्ही पातलों, तोंच तेथें
तळें सुंदर वर्तुळाकृती होते

जळीं टाकुनि पाऊल एकमेक
बघत आम्ही बैसलो दृश्य एक ४

कमल सुंदर त्यामध्यें उमललेलें
वाट भृंगाची बघत राहियेलें
तोंच गुंजारव करित येइ भृंग
आणि प्रेमाराधनीं होइ दंग ५

चुंबनातें कमलांत भृंग जाई
तोंच कमलाची कळी एक होई
बोललो मी तेधवां मत्प्रियेस
किती भृंगाचा 'गोड बंदिवास' ?

'काव्यरत्नावली' नोव्हेंबर १९३१



# जादुवाला

(जाति :-- चंद्रकला)

निद्रावश जेव्हां – मंचकीं बघतो तुज बाले !
निद्रेंतच न कळे – तुझे कां मंदस्मित चाले ?
मधुर भावनांचे – उठति कां तरंग हृदयांत ?
हृन्मीलन अथवा – कुणाशी स्वप्नीं तव होत ?
केशकलापांत – कुणी का खोवितसे फूल ?
लज्जेचे स्मित तें – म्हणूनि दावितेस ? बोल
बकुळीची माळा – गुंफुनी कोमल हातांनी
निज पंचप्राणा – अर्पिता हंससी कां वदनीं ?
अवचित उद्यानीं – पाहतां हृदयवल्लभाला
तुझी हास्यकलिका – लागते का उमलायाला ?
नेत्रद्वय मिटुनी – कुणाचे चिंतन तूं करिसी ?
निद्रावश जर तूं – कुणाशी सांग तदा हंससी ?
तव यौवन-कलिका – लागली फुलावया जों न
येउन तव स्वप्नीं – भेटतो भ्रमर असा कोण ?
तूं असतां शयनी – मुखेंदु तुझा तेजपूर्ण

जागृतींत सखये ! –   दिसे कां असा उदासीन ?
उदास होउन कां –   उसासे सोडितेस बाले !
हृदय तुझे हळवे –   कशाने हें व्याकुळ झाले ?
कोण असा जगतीं –   कळेना असे जादुवाला
जो तुजला शयनीं –   लावितो नित्य हंसायाला

'विश्ववाणी' नोव्हेंबर १९३२

## कल्याणचा श्री राममारुति तिथ्युत्सव

भक्तिरसाची भरती येते या उत्सव–सागरा
न शंका यांत खरोखर जरा
भाविक जन या ठायीं हर्षें पहारा करिती खडा
त्रिकाळी वाजेही चौघडा
ठायीं ठायीं संतजनांच्या प्रतिमा या पाहुनी
कां नच जावें मन मोहुनी ?

अलंकारभूषीत दिव्य हा मंडप शृंगारित–
पाहुनी कोण न हो मोहित ?

क्रीडा खेळे वायूसंगें जैं मंडप–झालर
न कळे कां कांपे थरथर ?

सुमनांचा दशदिशीं दरवळे सुगंध रात्रंदिन
न व्हावें आनंदित कां मन ?

संगित–शास्त्री गवई यांचे श्रवुनी मधु गायन
होतसे श्रोतृवर्ग तल्लिन

'कीर्तन कोकिळ' 'कीर्तन पटु' अन् हे 'कीर्तन–केसरी'
येउनी आळविती श्रीहरी

कुणी येउनी विविध प्रकारें दाविति निज आसनें
वेधुनी रसिकजनांची मनें

राममारुती उत्सव–महिमा वर्णांवा मीं किती ?
खरोखर कुंठित होते मति

'प्रतियोगी' सप्टेंबर १९२९



# निसर्गाचें संगीत

स्वैर खेळतां समीर — माझ्या दिव्य उद्यानांत
वृक्षांचे चाले संगीत

गंभीर तो रत्नाकर — घेई तानावरी तान
निशिदिनीं गाई गान

नागमोडीच्या चालीनें — धांवे स्वैर हा निर्झर
काढीत मंजूळ सूर

वर्षाऋतु पातला हा — टप् टप् टप् हो सभोंवार
मोत्यांचा सडा भूवर

हस्तनक्षत्रामधील — मेघराजाची गर्जना
गाण्याच्या भेसूर ताना

धबधबा उंचावरून — काढीत गंभीर ध्वनि–
येई खाली गात गाणीं

किर्र किर्र अशा रवें — निनादले माळरान
कीटकांचे चाले गान

मंडूक हे संगीतज्ञ — शेतीच्या बांधासभोंती
डरॉंव डरॉंव गीत गाती

निसर्गाचें हें संगीत — गातां गातां खरोखरी
थके कवीची वैखरी

‘स्फूर्ति’ मे १९३२

# धिक् मानवी जीवित

( सुनीत )

आकाशांत विहंग स्वैर फिरती निष्काळजी वृत्तिनें
अन् व्याघ्रादिक श्वापदें विहरती स्वच्छंद रानीं वनीं
तोयीं मीन विहार स्वैर करिती, कोकीळ वृक्षांतुनी
घेई गोड लकेर, देइ लतिका वृक्षास आलिंगने

सारे हे पशुपक्षि, निर्जिव तशा वस्तूहि पृथ्वींतिल
स्वानंदी रममाण, आणि दिसती स्वातंत्र्य सौख्यांकित
चिंतास्पर्श नसेल होत कधिंही या मूक प्राण्यांप्रत
आम्ही मानव कां सदैव न कळे नैराश्यि दुःखाकुल

स्वातंत्र्यें नटली गमे वसुमती, अन व्योमि सौदामिनी–
नाचे थय् थय्, गर्जनाहि करितो गंभीर रत्नाकर
विश्वाच्या अणुरेणुंतून निघतो 'स्वातंत्र्य' ऐसा ध्वनि
कां प्रोत्तुंग सभोंवती अमुचिया ह्या पारतंत्र्योत्कर ?

स्वातंत्र्याविण कंठणें व्यथितसे आयुष्य हें संतत
ईशा ! त्याहुनि मृत्यु एक बरवा धिक मानवी जीवित

'स्फूर्ति' जुलै १९३२

# केवळ तुझ्यासाठी

(वृत्त :– अभंग)

स्वार्थविवेकाला दिली मूठमाती
फक्त तुझ्यासाठीं जीवलगे *
मोद मी मानितों तुझ्याच चिंतनीं
ध्यास निशिदिनीं तुझा लागे
मोहपाश सारे झुगारून दूर
सेवेमध्यें चूर झालों तुझ्या
तूंच आतां मला आधार जीवनीं
प्राणसंजीवनी तूंच मला
पडो माझ्या माथीं संकटांच्या राशी
परी तुजपाशी आनंदी मी
ब्रह्मानंद मला तुझ्या सहवासीं
बाह्य जगतासी विसरतों
तोषवी मनास तुझे मंजुगान
वृत्ति हो बेभान तुझ्या ठायीं
तुझ्यासाठीं तुच्छ लखीलें जगास
नको उपहास करूं माझा !

* कवितेस उद्देशून

'प्रतिभा' १० एप्रिल १९३३

# शोभा गृहाची गृहिणी सुशील

( वृत्त :– इंद्रवज्रा )

मंदस्मितें दे पतिला प्रमोद
सासूस मंजुस्वनिं देइ साद
शालीनता अंगि वसे सलील
शोभा गृहाची गृहिणी सुशील १

पावित्र्य नांदे नित ज्या गृहांत
वाटे समाधान तिथें प्रशांत
लक्ष्मी सदा वास तिथें करील
शोभा गृहाची गृहिणी सुशील २

कौशल्य जीचे कशिद्यांत पूर्ण
जी पाकशास्त्रांत सदा प्रवीण
ती देवता मंगलता वरील
शोभा गृहाची गृहिणी सुशील ३

खांद्यावरी घे गृहिणी स्व-मूल
वेलीवरी जेंवि प्रफुल्ल फूल
हें दृश्य कां चित्त न तोषवील ?
शोभा गृहाची गृहिणी सुशील ४

गेहास शोभा नच दौलतीनें
कारागिराच्या अथवा कृतीनें
स्त्रीवांचुनी नाहिं गृहास मोल
शोभा गृहाची गृहिणी सुशील

'स्त्री' फेब्रुवारी १९३५



## निसर्गाचा न्याय

(वसंततिलका)

ग्रीष्मर्तुनें धरणि ही बहु तप्त झाली
व्योमांतुनी म्हणुन पाउस येइ खालीं
वर्षर्तुनें वसुमती प्रमुदीत होय
आहे विलक्षण खराच निसर्ग–न्याय

'शालापत्रक' आगस्ट १९३५

# झुरतेस अशी कां सांग मनीं ?

( जाति :–प्रणयप्रभा )

झुरतेस अशी कां सांग मनीं ?
लव कळुं दे हृद्गत तव वदनीं ॥ धृ ॥

यौवन–निधि तव जाई वाया
लागलीस का म्हणुनि झुराया ?
कृश झाली तव नाजुक काया
कां अश्रु आणिसी वद नयनीं ? ॥ १ ॥

"वडिलांजवळीं नुरला पैसा
विवाह अपुला होइल कैसा ?"
सदा मानसीं विचार ऐसा–
करितेस काय तूं ? बोल झणीं ॥ २ ॥

दोष न हा तव दारिद्र्याचा
समाज अपुला निष्ठुर साचा
"जगतीं नाहीं कुणी कुणाचा"
हा न्याय न कां अवगत अजुनी ? ॥ ३ ॥

शीलवंत तुम्हि अबला नारी
मनांत अपुल्या झुरतां भारी

समाज अपुला परि अविचारी-

हो निद्रावश निज सुखशयनीं ॥ ४ ॥

मूक भावना स्त्री-हृदयांतिल

सुज्ञ (?) समाजा केवी कळतिल

कूट प्रश्न मानस-शास्त्रांतिल-

कधि समाज दाविल सोडवुनी ? ॥ ५ ॥

'स्त्री' जानेवारी १९३३

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७९८३ काव्य
2992 2.2.63

# ध्येय-मार्गावर

'वेड्या ! हा अविचार सोड अगदीं'

स्नेही वदूं लागले

द्याया दूषण आप्तवर्ग सगळा

प्रवृत्त झाला मला

या अस्वस्थ मनस्थितींत अपुलें

कर्तव्य मी जाणिलें

'शिष्टाचार' परंतु पाउल पुढें

टाकूं न देई मला

प्रेमाचे मृदु पाश हाय ! पडले

माझ्या गळ्याभोंवतीं

'कर्तव्यास मुकूं नको' वदतसे
आंतून माझें मन
प्रीतीव्यापृत चित्त तोडु न शके
नाजूक हें बंधन–
तेव्हां जागृत जाहलों त्वरित मीं
होऊन ध्येयस्मृति
शत्रूंनीं पथ रोधिण्या पसरिले
कांटे विषारी जर
मेरू वा सरिता समोरुन जरी
झालीं मला आडवी
दुष्टांनी शर सोडुनी मजवरी
केलें जरी जर्जर
गांठाया नव–ध्येय–मंदिर पुढें
प्राणास मी वेंचिन

० ०

धैर्यानें चढण्या महा बिकट हा
'आत्मोन्नती'चा गिरी
उत्कर्ष–ध्वज जिंकण्यासहि उभा
मी ध्येय–मार्गावरी

'किर्लोस्कर' मार्च १९३३

REFBK-0018594
REFBK-0018594